सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात

### ऑगस्ट महिन्यात तब्बल 14 दिवस बँका राहणार बंद

**मुंबई :** जर तुम्हाला ऑगस्ट महिन्यात बँकेचे काही महत्त्वाचे व्यवहार किंवा कामे करायची असतील, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) ऑगस्ट २०२६ मधील बँकांच्या सुट्ट्यांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. या यादीनुसार, स्वातंत्र्य दिन, सण-उत्सव आणि साप्ताहिक सुट्ट्या मिळून देशातील विविध राज्यांमध्ये बँका एकूण १४ दिवस बंद राहणार आहेत. त्यामुळे बँकेच्या शाखेत जाण्यापूर्वी सुट्ट्यांचे हे पत्रक तपासूनच घराबाहेर पडणे सोयीचे ठरेल.

**ऑगस्ट २०२६ मधील प्रमुख बँक सुट्ट्यांची यादी :** २ ऑगस्ट (रविवार) - साप्ताहिक सुट्टी (सर्वत्र बंद), ८ ऑगस्ट (दुसरा शनिवार) - महिन्याचा दुसरा शनिवार (सर्वत्र बंद), ९ ऑगस्ट (रविवार)- साप्ताहिक सुट्टी (सर्वत्र बंद), १३ ऑगस्ट (गुरुवार) - देशभक्त दिन (विशेषतः मणिपूरमध्ये सुट्टी), १५ ऑगस्ट (शनिवार) - स्वातंत्र्य दिन (राष्ट्रीय सुट्टी – देशभरात बँका बंद), १६ ऑगस्ट (रविवार) - साप्ताहिक सुट्टी (सर्वत्र बंद), २२ ऑगस्ट (चौथा शनिवार) - महिन्याचा चौथा शनिवार (सर्वत्र बंद), २३ ऑगस्ट (रविवार) - साप्ताहिक सुट्टी (सर्वत्र बंद), २५ ऑगस्ट (मंगळवार) - ईद-ए-मिलाद (विविध राज्यांत स्थानिक सुट्टी), २८ ऑगस्ट (शुक्रवार) - रक्षाबंधन (काही प्रमुख राज्यांमध्ये सुट्टी), ३० ऑगस्ट (रविवार) - साप्ताहिक सुट्टी (सर्वत्र बंद).

### 'ॲट्रॉसिटी'चे खटले चालवण्यासाठी अहिल्यानगरला विशेष न्यायालय

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानूसार दाखल प्रकरणे चालवण्यासाठी अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासोबतच न्यायालयासाठी न्यायाधीशाच्या एका पदासह सात नियमित व बाह्य यंत्रणेकडून दोन कर्मचारी उपलब्ध करण्यास खर्चासह मंजुरी दिली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात ॲट्रॉसिटीचे १०१४ खटले प्रलंबित आहेत.'ॲट्रॉसिटी'चे खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालय मंजूर झाले असले तरी त्याच्या स्वरूपाबद्दल अद्याप वकिलांमध्ये स्पष्टता नाही. ॲट्रॉसिटीचे खटले चालवण्यासाठी यापूर्वी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाकडे विशेष अधिकार देण्यात आले आहेत. आता नगरमध्ये विशेष न्यायालय स्थापन केले जाणार असल्याने जिल्ह्यात इतरत्र चालणारे खटले नगरमधील या विशेष न्यायालयाकडे वर्ग केले जाणार का; असाही प्रश्न वकिलांकडून उपस्थित केला जात आहे.

### पैठणला सर्वदूर पाऊस

तभा वृत्तसेवा

**पैठण दि 30 :-** पावसाळा सुरू झाल्यापासून पैठणला सरासरी बरसणारा पाऊस गुरुवारी अगदी दिवसभर कोसळत असल्याने तालुक्यात सर्व दूर अतिवृष्टीदृष्य परिस्थिती निर्माण होत नागरिकांना दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. प्रदीर्घ प्रतीक्षानंतर पैठण तालुक्यात गुरुवार दिनांक 30 जुलै सकाळपासूनच चांगला पाऊस होत असतांना दुपारच्या दरम्यान पावसाने जोर धरत मुसळधार कोसळला परिणामी शहर तसेच ग्रामीण भागात जाणाऱ्या रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक खोळंबली होती. त्याचप्रमाणे दिवसभराच्या संततधार पावसामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.या पावसामुळे जायकवाडी धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली असून नाथसागर जलाशयाचा पाणीसाठा 70 टक्केच्या वर सरकला आहे. गुरुवारी दिवसभर नागरिकांना सूर्यदर्शन झाले नसल्याने तालुक्याभरात हुडहुडीचे वातावरण आहे.

# 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानामुळे महाराष्ट्राच्या युवाशक्तीला नवी दिशा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून कौतुक आणि शुभेच्छा

**नवी दिल्ली:** देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला आणि पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्राला व्यसनमुक्त बनवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. राज्य सरकारद्वारे सुरू करण्यात आलेल्या 'ड्रग्स फ्री मुंबई' या विशेष अभियानाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनापासून स्वागत केले आहे. या अभियानामुळे तरुणांमध्ये जनजागृती निर्माण होऊन एक सक्षम, सबल आणि नशा मुक्त समाज घडवण्याच्या दिशेने मोठी मदत होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला आहे.

### विकसित भारताची खरी शक्ती: युवाशक्ती



भारताच्या विकासाच्या प्रवासात देशातील युवकांचे स्वप्न आणि त्यांचे संकल्प हीच सर्वात मोठी शक्ती आहे. युवकांच्या अंगातील ऊर्जा, त्यांची अफाट प्रतिभा आणि सकारात्मक विचारसरणी यामुळे राष्ट्रप्रगतीला एक नवी गती आणि दिशा मिळू शकते. जेव्हा तरुण आपल्या दैनंदिन जीवनात शिस्त, आत्मविश्वास आणि उत्तम मूल्यांचा स्वीकार करतात, तेव्हा ते केवळ स्वतःचे आयुष्य घडवत नाहीत, तर देशाच्या प्रगतीमध्ये एक महत्त्वाचे भागीदार बनतात.

**व्यसनाधीनता:** समाज आणि राष्ट्रासमोर एक गंभीर आव्हान

नशा ही केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून ती संपूर्ण समाजाच्या स्वास्थ्य, सुरक्षा, शांतता आणि विकासासाठी एक अत्यंत गंभीर आव्हान आहे. मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तीची निर्णयक्षमता, आत्मविश्वास आणि आयुष्याची दिशा पूर्णपणे कोलमडते. याचा अत्यंत वाईट परिणाम संबंधित व्यक्तीच्या कुटुंबावर आणि पर्यायाने संपूर्ण समाजावर होतो. आजची तरुण पिढी ही देशाचे भविष्य आहे, परंतु हे मादक पदार्थ तरुणांच्या अमूल्य प्रतिभेसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी एक मोठा धोका बनले आहेत. या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केवळ कायदे किंवा प्रशासकीय पावले पुरेशी नसून, यासाठी सामाजिक जाणिवा, कुटुंबाचे संस्कार, सामूहिक जबाबदारी आणि संस्थात्मक प्रयत्नांची मोठी जोड असणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

जन-आंदोलनाचे स्वरूप घेतलेला 'नशा मुक्त भारत' संकल्प

देशभरात 'नशा मुक्त भारत' या अभियानाला एक मोठे जन-आंदोलन स्वरूप प्राप्त झाले आहे. यात विद्यार्थी, तरुण, विविध सामाजिक संघटना आणि स्वयंसेवी संस्था अत्यंत सक्रियपणे सहभाग घेत आहेत. लोकांमध्ये व्यापक जनजागरूकता निर्माण करणे, समुपदेशन सेवा पुरवणे आणि व्यसनमुक्तीसाठी पुनर्वास केंद्र सुरू करणे यासारख्या अनेक उपाययोजना सातत्याने राबवल्या जात आहेत. गेल्या काही वर्षांत या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम देखील दिसून आले आहेत.

# राज्यातील रुग्णवाहिकांसाठी आता 'कॅशलेस पेट्रोकार्ड'

## इंधनाच्या कारणांवरून होणारे रुग्णांचे हाल थांबणार



**मुंबई :** "राज्यातील आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही आणि पारदर्शक करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, रुग्णवाहिकांसाठी सुरू करण्यात आलेला 'कॅशलेस पेट्रोकार्ड' उपक्रम हा या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या उपक्रमामुळे १०२ रुग्णवाहिका सेवांचे व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन इंधनाच्या अभावी रुग्णांचे होणारे हाल थांबतील", असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

मुंबईतील आरोग्य सेवा आयुक्तालयात गुरुवारी आयोजित एका कार्यक्रमात 'कॅशलेस पेट्रोकार्ड' उपक्रमाचे उद्घाटन आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील शासकीय वाहनांना वेळेत इंधन उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आरोग्य सेवेला नवी दिशा देणारा हा अभिनव उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. या माध्यमातून हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) यांच्या सहकार्याने राज्यातील ३ हजार १९५ रुग्णवाहिकांना 'कॅशलेस पेट्रोकार्ड' दिले जाणार आहे.

कार्यक्रमाला आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत, उपसंचालक जयंत मुळे यांच्यासह एचपीसीएल कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे संचालक विजय कंदेवाड, राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना प्रकाश आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा ही सर्वसामान्यांसाठी जीवनदायी व्यवस्था आहे. पेट्रोकार्डमुळे रुग्णवाहिकांच्या इंधन खरेदी व्यवस्थापनासह आर्थिक पारदर्शकता येईल, कामकाजातील अनावश्यक विलंब कमी होईल आणि संपूर्ण यंत्रणा अधिक उत्तरदायी बनेल.

# सोनम वांगचुक यांनी चक्क आता केलं मोदी सरकारचं कौतुक

**नवी दिल्ली :** शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी सातत्याने आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी केंद्र सरकारच्या एका निर्णयाचं कौतुक केलं आहे. परीक्षांमधील गैरप्रकार आणि प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने संसदेत मांडलेल्या परीक्षा सुधारणा विधेयकाचं वांगचुक यांनी स्वागत केलं.

नीट परीक्षेतील पेपर लीक प्रकरणावरून केंद्र सरकारविरोधात आवाज उठवत सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतर-मंतरवर २६ दिवस उपोषण केलं होतं. या आंदोलनानंतर सरकारने परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी पावले उचलण्याचं आश्वासन दिलं होतं. आता संसदेत विधेयक मांडण्यात आल्यानंतर वांगचुक यांनी समाधान व्यक्त केलं आहे. सोनम वांगचुक यांनी म्हटलं की, परीक्षांमधील पारदर्शकता वाढवण्यासाठी घेतलेले निर्णय स्वागतार्ह आहेत. मात्र, सुधारणा केवळ परीक्षा पद्धतीपुरत्या मर्यादित न राहता संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत बदल घडवून आणणाऱ्या असाव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. "परीक्षांमधील सुधारणांबाबत संसदेत विधेयक आणण्यात आलं याचा आनंद आहे. या सुधारणा पुढे शिक्षण व्यवस्थेतही सकारात्मक बदल घडवतील, अशी आशा आहे," असं वांगचुक यांनी सांगितलं.

**उपोषणानंतर वंदे भारतमधून केला प्रवास :** जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान सोनम वांगचुक हे आंदोलनाचा प्रमुख चेहरा ठरले होते. १८ जुलै रोजी त्यांना आंदोलनस्थळावरून हटवून रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळाला होता.

# नाशिक जिल्ह्यातील 16 शाळांना शिक्षण विभागाची नोटीस

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सोळा शाळांना राज्य शासनाची आवश्यक परवानगी न घेता शाळा सुरू ठेवल्याप्रकरणी शिक्षण विभागाने नोटीस पाठवली आहे. तसेच जिल्ह्यातील १६ अनधिकृत शाळांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या असून पालकांनाही पाल्यांचे तातडीने शासनमान्य शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

शासन नियमांना केराची टोपली

नियमानुसार इयत्ता पहिली ते सातवी, पाचवी ते आठवी तसेच आठवी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. २०१९ पूर्वी शिक्षण विभाग, शिक्षण उपसंचालक आणि शिक्षण संचालक कार्यालयामार्फत मान्यता दिली जात होती. मात्र, आता शाळांना ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो.

शासनाची पूर्वपरवानगी घेऊनच शाळा सुरु करावी लागते तरीही काही शाळांनी या सूचनांकडे कानाडोळा केल्याचं जिल्ह्यात पहायला मिळालं आहे. त्यामुळे मात्र या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मान्यतेचा प्रश्न भविष्यात निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने पालकांनी सावधगिरी बाळगून आपल्या पाल्यांचे प्रवेश अधिकृत परवानगीधारक शाळांमध्ये घ्यावेत, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

**नोटीस बजावण्यात आलेल्या शाळा :**

**नाशिक तालुका :** अभिनव बालविकास मंदिर, मातोरी, चैतन्य टेक्नो स्कूल, चांदशी

**निफाड तालुका :** डी. व्ही. पी. मंडळ डे केअर सेंटर, नांदुर्डी

**बागलाण तालुका :** ड्रिम्स इंटरनॅशनल स्कूल, नामपूर, जिनियस किड्स अकॅडमी, नामपूर, मलबेरी बुश इंटरनॅशनल स्कूल, नामपूर, किलबिल इंग्लिश मीडियम स्कूल, नामपूर, होरायझन अकॅडमी, शेमळी,

**चांदवड तालुका :** कंचनसुधा इंटरनॅशनल स्कूल, शिंगवे

**देवळा तालुका :** एव्हरग्रीन स्कूल ऑफ एक्सलन्स, दहिवड, के. बी. इंग्लिश स्कूल, खारीपाडा, अभिनव बालविकास मंदिर

**मालेगाव तालुका :** मातोश्री इंग्लिश मीडियम स्कूल, टिंगरी

**दिंडोरी तालुका :** किड्स टाऊना इंग्लिश मीडियम स्कूल, वलखेड फाटा, बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी (मराठी माध्यम), बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी (इंग्रजी माध्यम)

शासनाच्या परवानगीविना सुरू असलेल्या शाळांना आम्ही नोटिसा बजावल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश अधिकृत परवानगी असलेल्या शाळांमध्ये स्थलांतरित करावेत असे आवाहन नाशिक जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी साईलता सामलेटी यांनी केले आहे.

# धनश्री पठाडे हिचे ग्लोबल शेपर्स ॲन्युअल समिट - 2026 मध्ये प्रभावी प्रतिनिधीत्व

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याची कन्या धनश्री शेषराव पठाडे हिने नुकतेच स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मुख्यालयातील ग्लोबल शेपर्स ॲन्युअल समिट-२०२६ मध्ये पुणे हबचे प्रभावी प्रतिनिधीत्व करत जागतिक व्यासपीठावर कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

'सिग्नल्स फॉर फ्युचर' या मुख्य संकल्पनेवर आधारित या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगभरातील १२० हून अधिक देशांतील सुमारे ४५० युवा नेते सहभागी झाले होते. स्थानिक समस्यांवर युवकांच्या माध्यमातून शाश्वत उपाय शोधणे आणि जागतिक स्तरावर सकारात्मक बदल घडवणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. ग्लोबल शेपर्स कम्युनिटी ही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा एक भाग आहे.




विविध सत्रांत सहभाग

छत्रपती संभाजीनगरची धनश्री पठाडे सध्या ग्लोबल शेपर्स कम्युनिटी, पुणे हबच्या क्युरेटर म्हणून कार्यरत आहेत. या परिषदेदरम्यान तिने एआय, शाश्वत विकास, मानसिक व महिला आरोग्य, युवक रोजगार, प्लास्टिक प्रदूषण, डिजिटल सुरक्षितता आणि लॉन्जेव्हिटी इकॉनॉमी या विषयांवरील सत्रांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

* यशाची श्रेय ग्लोबल शेपर्स कम्युनिटीला

या यशाचे श्रेय धनश्री पठाडे यांनी संपूर्ण ग्लोबल शेपर्स कम्युनिटी पुणे हबमधील सर्व शेपर्स, माजी सदस्य आणि आपल्या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येकाला दिले आहे. एका सामान्य मराठी मुलीवर विश्वास ठेवून, तिला नेतृत्वाची संधी देऊन आणि समाजासाठी काम करण्याचा आत्मविश्वास देणाऱ्या या समुदायामुळेच जागतिक स्तरावर पुणे हबचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याचे धनश्रीने सांगितले. यंदाच्या कार्यकाळात हरित कुमार ( व्हाईस क्युरेटर करत आहे) आणि शर्वरी रास्ते (Impact Officer) यांच्यासोबत धनश्री पठाडे पुणे हबच्या क्युरेटरशिप टीमचे नेतृत्व करत आहेत. २०१२ मध्ये अंशू गौर यांनी पुण्यात ग्लोबल शेपर्स हबची स्थापना केली. तेव्हापासून अनेक शेपर्स आणि माजी सदस्यांनी समाजाभिमुख कार्य, नेतृत्व आणि समुदायभावनेची समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. याच परंपरेचा आणि संस्कृतीचा वारसा पुढे नेत, पुणे हबने गेल्या अनेक वर्षांत उभा केलेला प्रभाव अधिक सक्षम करण्यासाठी आणि नव्या युवकांना समाजपरिवर्तनाच्या प्रवासात सहभागी करून घेण्यासाठी यंदाची क्युरेटरशिप टीम सातत्याने कार्यरत आहे.

### स्थानिक तरुणांनी पुढाकार घ्यावा





मराठवाड्याच्या मातीतून सुरू झालेला प्रवास जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचू शकतो, हा विश्वास देणारा हा अनुभव आहे. येथील दुष्काळ, पाणीटंचाई, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढे येणे आवश्यक आहे. ग्लोबल शेपर्ससारखी व्यासपीठे त्यांना नक्कीच जागतिक मार्गदर्शन करून संधी मिळवून देतील.

\- धनश्री पठाडे

# शिर्डी गुरुपौर्णिमा उत्सवाची काल्याच्या किर्तनाने सांगता!

शिर्डी (प्रतिनिधी) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने तीन दिवस सुरु असलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता गुरुवारी ह.भ.प. वेदश्री वैभव ओक, डोंबिवली यांच्या किर्तनानंतर दहिहंडी फोडुन झाली.



गुरुपौर्णिमा उत्सवाच्या सांगता दिनी गुरुवारी सकाळी संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वैशाली दराडे यांनी समाधी मंदिरात श्रींची पाद्यपुजा केली. तर गुरुस्थान मंदीर येथे संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नि सौ. वंदना गाडीलकर यांच्या हस्ते रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर काल्याच्या किर्तनानंतर समाधी मंदिरात श्री साईबाबांचे समकालीन भक्त तात्या पाटील कोते यांचे वंशज परीवारातील सदस्य ऋतुराज निलेश कोते यांच्या हस्ते दहिहंडी फोडण्यात आली. यावेळी मंदीर विभाग प्रमुख विष्णु थोरात, जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे, सचिन तांबे ,अमृत गायके, सुधाकर शिंदे, राजेंद्र सुभाष कोते, विशाल कोते,संजय शिंदे अशोक गायके,मिलिंद शेळके,वैभव कोते आणि साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी साईबाबांची माध्यान्ह आरती झाली. त्यानंतर निरज शर्मा नवी दिल्ली यांचा साई भजन कार्यक्रम झाल्यानंतर राज आचार्य, कोलकत्ता साई कि लिला कार्यक्रम संपन्न झाला .सायंकाळी विजय साखरकर, बोरीवली यांचा साईस्वर नृत्योत्सव कार्यक्रम संपन्न झाला.सांगता दीनी गुरुवार असल्याने रात्रौ श्रींचे गुरुवारचे नित्याचे पालखीची मिरवणुक झाली. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या सांगता दिनी तामिळनाडु, चैन्नई येथील साईभक्त श्री. आर. वेत्री सेल्वी अव्वल राज यांनी श्री साईबाबांच्या चरणी ३२.०२०० ग्रॅम वजनाची आकर्षक नक्षीकाम असलेली सुवर्ण साखळी अर्पण केली. या सुवर्ण साखळीचे देणगी मुल्य ४ लाख २० हजार ९८३ रुपये आहे.

हा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे, समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी , उप कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे सर्व प्रशासकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भाजी मार्केट एस.बी.आय. शाखेची सुविधा ढेपाळली

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** जुन्या पैठणसाठी महत्वाची असलेली स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा भाजी मार्केट बँकेत बँक अधिकाऱ्यांच्या उद्धटपणामुळे ग्राहकांची अडवणूक होत असून बँक वरिष्ठांनी या बाबीकडे लक्ष द्यावे अशी मागणी बँकेच्या खातेदारांनी केली आहे.




भाजी मार्केट स्टेट बँक ऑफ शाखेत कर्मचारी तसेच अधिकारी यांच्या बेबनाव कारभाराने खातेदारांना पार मानस्ताप होत आहे. पैसे काढण्यासाठी आलेल्या खातेदारांना बँकेत कॅश शिल्लक नाहीचे कारण देत.त्यांना ग्राहकसेवा केंद्राचे लाड पुरवण्यासाठी सेवा केंद्रात पाठवले जात आहे. त्यांच प्रमाणे शेतकरी,पेन्शनर्स, कामगार, ठेवीदार यांना स्थानिक अकाउंटंट केवायसी, ई केवायशी, सर्व्हर डाऊन,इन्शुरन्स सक्ती,गोल्ड लोन, एफडी, एटीयम तसेच क्रेडिड कार्ड सक्ती सारखे प्रकार करत आहे. यामुळे बँकेत पैसे काढण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांना मनस्ताप होत आहे. काही अधिकारी तर वृद्ध, महिला व विद्यार्थी खातेदारांना उद्धटपनाने बोलत असल्याचे सांगण्यात येत आहे. एकंदरीत बँक अधिकारी, कॅशियार यांच्या उद्धट पणामुळे भाजी मार्केट शाखेची सेवा ढेपाळली आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# शासनाच्या सर्व योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत : आ. नमिताताई मुंदडा

## अंबाजोगाईत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात; हजारो लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ

**अंबाजोगाई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अंबाजोगाई येथील आर्यवीर मंगल कार्यालयात मंगळवारी (दि. २८ जुलै) 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिरातून केज विधानसभा मतदारसंघातील हजारो नागरिकांच्या महसूल व विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला. विविध विभागांच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिताताई मुंदडा या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाई च्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरगे-सोनवणे, अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा, केज नगर परिषदेचे गटनेते हारूनभाई इनामदार, विधानसभा प्रमुख बाळासाहेब शेप, केज विधानसभा अध्यक्ष शरद इंगळे, तर व्यासपीठावर उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, केजचे तहसीलदार कुलकर्णी, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सहाय्यक गटविकास अधिकारी सौ. फड, अंबाजोगाई नगरपालिकेचे प्रभारी मुख्याधिकारी सचिन देशपांडे, केज नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अजित ढोपे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



४२ विभागांच्या सेवा एकाच छताखाली

प्रास्ताविकात उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी सांगितले की, महसूल विभागाच्या पुढाकारातून २२ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत केज विधानसभा मतदारसंघात हे अभियान राबविण्यात येत आहे. या शिबिरात तब्बल ४२ विभागांच्या सेवा व योजना नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शासनाच्या योजना थेट नागरिकांच्या दारात पोहोचविण्याचा हा उपक्रम असून भविष्यात दर तीन महिन्यांनी प्रत्येक मंडळ स्तरावर अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

शासन-प्रशासन ही विकासाची दोन चाके – अश्विनी जिरगे

अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरगे-सोनवणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शासन आणि प्रशासन ही विकासाची दोन महत्त्वाची चाके आहेत. या दोघांच्या समन्वयातूनच लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातबाऱ्यावर महिलांचे नाव नोंदविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला असून, मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर झालेल्या रस्ते विकासामुळे ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

सर्व योजनांचा लाभ प्रत्येकापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध – आ. नमिताताई मुंदडा

उद्घाटनपर भाषणात आमदार नमिताताई मुंदडा म्हणाल्या की, केज विधानसभा मतदारसंघाच्या विकासाची पायाभरणी स्वर्गीय आ. डॉ. विमलताई मुंदडा यांनी केली असून, त्यांचा विकासाचा वारसा पुढे नेण्याचे कार्य सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या सहकार्यामुळे मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकासकामे होत आहेत.

"शासनाच्या सर्व योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शासनाचा लाभ घेतलेल्या प्रत्येक नागरिकाने या योजनांची माहिती इतरांपर्यंत पोहोचवावी. ग्रामीण भागातील गोरगरीब नागरिकांना अशा शिबिरांचा मोठा फायदा होत असून, दर तीन महिन्यांनी अशा स्वरूपाची शिबिरे होणे गरजेचे आहे," असे त्या म्हणाल्या.

त्यांनी फार्मर आयडी, शेतकरी कर्जमाफी, महिलांच्या नावाची सातबारा नोंद यांसारख्या विषयांवरही भाष्य केले. तसेच तरुणांनी अशा शिबिरांमध्ये सहभागी होऊन प्रशासकीय प्रक्रियेची माहिती करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

लाभार्थ्यांना साहित्य व प्रमाणपत्रांचे वितरण

यावेळी कृषी विभागामार्फत ट्रॅक्टरसह विविध कृषी साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच महसूल, ग्रामविकास, सामाजिक न्याय, पंचायत राज आदी विभागांच्या विविध योजनांतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे, मंजुरीपत्रे व आवश्यक कागदपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अनेक नागरिकांच्या प्रलंबित महसुली कामांचा जागेवर निपटारा करण्यात आल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

यावेळी युवा नेते अक्षय मुंदडा, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, नगराध्यक्षा सीताताई बनसोड आदींनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी तर आभार तहसीलदार विलास तरंगे यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली. अंबाजोगाई व केज तालुक्यातील हजारो नागरिक, महिला-पुरुष व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "स्व.आडसकर" आजही त्यांच्या कार्यातून अमर : रमेशराव आडसकर

## स्व.बाबुरावजी आडसकर मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्काराने सन्मानित



**अंबाजोगाई :** स्व. बाबुरावजी आडसकर आजही त्यांच्या केलेल्या कार्यातून अमर आहेत. रोटरी क्लबने त्यांच्या कार्य कृत्वाचा गौरव करून त्यांच्या आठवणी जागृत केल्या. असे ऋणनिर्देश अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केले.

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने लोकनेते स्व. बाबुरावजी आडसकर यांना मरणोत्तर रोटरी भूषण जाहीर केला. व हा पुरस्कार रमेशराव आडसकर यांना प्रदान केला. यावेळी रोटरीचे ऋण व्यक्त करताना रमेशराव आडसकर बोलत होते.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे भावी प्रांतपाल क्षितिज झावरे,उप प्रांतपाल मेघराज पिंपळे, रोटरीचे अध्यक्ष शकील शेख, सचिव राधेश्याम लोहिया, मावळत्या अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या वेळी बोलताना रमेशराव आडसकर म्हणाले की सलग ५० वर्षे आडसकर साहेबांनी राजकारण नव्हे तर जनसेवा केली. या भागातील अनेक प्रश्न व समस्या त्यांनी मार्गी लावल्या. अनेक कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांच्या कार्याचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत. रोटरी क्लबने हा सन्मान बहाल करून त्यांच्या स्मृतीस उजाळा दिला. अशा शब्दात आडसकर यांनी या सत्काराला उत्तर दिले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ,सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, देऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सर्व आडसकर कुटुंबीय हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर उपस्थित होते.

सन्मानपत्राचे वाचन अविनाश मुडेगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन डॉ. प्रिया तिडके, वसुधा गडसिंग यांनी केले.तर उपस्थितांचे आभार राधेश्याम लोहिया यांनी मानले. या कार्यक्रमास मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धनुभाऊंनी उभारलेले जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय व शेतकरी भवन उद्घाटनाच्या प्रतिक्षेत

## 15 कोटींच्या भव्य इमारतीचे काम शेवटच्या टप्प्यात

**बीड (प्रतिनिधी) :** धनंजय मुंडे हे कोरोना काळात सामाजिक न्याय मंत्री असताना तसेच २०२३ पासून कृषीमंत्री असताना असे एकूण साधारण तीन वर्षे ९ महिने बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते. या काळात जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनेक मोठी कामे त्यांनी प्रस्तावित केली व सुरू केली. आता त्यातील अनेक कामे पूर्ण होत असून त्यांच्या समर्पित पालकत्वाची प्रचिती येताना दिसत आहे.



कोरोना काळात एका बैठकीच्या माध्यमातून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय अत्यंत जुन्या इमारतीत असून ही इमारत मोडकळीस आल्याचे समोर येताच, धनंजय मुंडे यांनी शासकीय जागेत भव्य कृषी अधिकारी कार्यालय, कृषी संबंधित सर्व अधिकारी कार्यालये एकाच छताखाली आणणारी तसेच त्याच ठिकाणी जिल्हा भरातून येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी भव्य शेतकरी भवन उभारणीच्या निर्णय घेतला. त्याचा प्रस्ताव तयार करून धनुभाऊनी तो शासनाच्या माध्यमातून मंजूर करून घेतला.

२०२३ मध्ये पुन्हा कृषीमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करत असताना या इमारतीस १५ कोटी रुपये निधी मंजूर करुन उपलब्ध करून दिला. आज ही भव्य इमारत उभारली असून पूर्णत्वाकडे जात आहे. फर्निचर वगैरे किरकोळ कामे सोडता उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे.

विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांनी याबाबतच्या श्रेयासाठी कधीही धडपड केल्याचे दिसून आले नाही!

धनंजय मुंडे यांच्या पालकमंत्री कार्यकाळात ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी जिल्ह्यात २२ वसतिगृहे मंजूर करण्यात आली, त्यातून १३ वसतिगृहाचे काम प्रगतीपथावर आहे. परळी येथील भव्य शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय अशा अनेक शैक्षणिक संस्था उभारल्या गेल्या. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अनेक अद्ययावत सुविधा निर्माण करण्यात आल्या. बीड जिल्हा ग्रामीण रुग्णालयात देखील वाढीव खाटा इमारत उभारली गेली.

# पंकजाताई मुंडे याच्या सामाजिक दायित्वाच्या आवाहनाला राज्यभरातून प्रतिसाद !

## हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले : पंकजाताई मुंडे

**परळी वैजनाथ :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपला वाढदिवस खर्चिक व उत्सवी स्वरूपात साजरा न करता सामाजिक दायित्वाच्या उपक्रमातून साजरा करण्याच्या केलेल्या आवाहनाला राज्यभरातून उदंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.आपल्या वाढदिवसानिमित्त राज्यभर लोक कल्याणकारी, पर्यावरणपूरक,सामाजिक हिताचे उपक्रम राबवून केलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल 'हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले आहे' अशा शब्दात लोककल्याणाच्या उपक्रमाबद्दल पंकजाताई मुंडे यांनी कृतज्ञ भावना व्यक्त केल्या आहेत.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी भावनिक शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली आहे. लोककल्याणाचा स्वीकारलेला मार्ग कोणत्याही परिस्थितीत न सोडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आपल्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी राज्यभर रक्तदान, वृक्षारोपण, अन्नदान, रुग्णसेवा, शैक्षणिक साहित्य वाटप आदी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. वैयक्तिक सत्कार किंवा भव्य कार्यक्रमांऐवजी समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्याचे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी यापूर्वीच केले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत राज्यभरात ठीकठिकाणी लोककल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी या आवाहनाला प्रतिसाद देत राबवलेल्या लोककल्याणकारी उपक्रमाबद्दल पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक करत कर्तव्य भावना व्यक्त केली आहे.

अशी आहे पंकजाताईंची आभाराची पोस्ट...

सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे की, "माझ्या वाढदिवसानिमित्त आपण लोककल्याणकारी कार्यक्रम राबवून माझ्यासाठी प्रार्थना केल्या. हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले आहे. मी सदैव ऋणात राहीन. मी उतरणार नाही, मी मातणार नाही आणि मी घेतलेला वसा टाकणार नाही.". दरम्यान, या संदेशातून त्यांनी समाजसेवेची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. जनतेचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हेच आपली सर्वात मोठी ताकद असल्याचे सूचित करत लोकहितासाठी अविरत कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## माझे बाबाच माझे गुरु; त्यांच्या संस्कारांतूनच लोकसेवेसाठी समर्पित जीवनाचा संकल्प

# गुरुपौर्णिमेनिमित्त ना.पंकजाताई मुंडे यांचे लोकनेत्याला मनोभावे नमन!

**परळी वैजनाथ दि. २९ :** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नागरिकांना शुभेच्छा देत गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृतीत गुरुपौर्णिमेला विशेष महत्त्व असून जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या प्रत्येक गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. माझे बाबा लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब हेच माझे गुरु असुन त्यांच्या संस्कारांतूनच लोकसेवेसाठी समर्पित जीवनाचा संकल्प असल्याची दृढ भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.



गुरुपौर्णिमेनिमित्त ना. पंकजाताई मुंडे यांनी आपले पिता - नेता आणि गुरु लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना मनोभावे नमन केले. याप्रसंगी सर्वांना शुभेच्छा देत गुरूंच्या ऋणाची महती सांगताना त्यांनी सर्वांना महत्त्वपूर्ण संदेश दिला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, आपल्याला जीवनात उभे राहायला शिकवणारे, घडवणारे सर्वच गुरु हे देवतुल्य आहेत. आई-वडील हे देखील आपल्या जीवनातील पहिले गुरु आहेत. माझ्या आयुष्यातील गुरूस्थान माझे वडील, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे आहे. त्यांनी मला आयुष्यभर खूप काही शिकवले. आजही त्यांच्या प्रत्येक कृतीतून मला प्रेरणा आणि शिकवण मिळते. त्यामुळे त्यांच्या चरणी मी नतमस्तक आहे. याच भावनेतून आपण अधिक मेहनत करून, अधिक लोकसेवा करत लोक कल्याणासाठी समर्पित जीवन जगण्याचा संकल्प केला असल्याचे त्यांनी नमूद केले. आजच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येकाने एक चांगला संकल्प करावा आणि आपल्या गुरूंना अभिमान वाटेल असे कार्य करून त्यांच्या संस्कारांचे ऋण फेडावे असे आवाहनही त्यांनी केले.

# अजित स्मृती व्याख्यानमालेमुळे पोकळी भरुन काढण्याचा प्रयत्न

## श्रीमती ज्योतीताई मेटे यांचे प्रतिपादन

**बीड (प्रतिनिधी) :** लाखाचा पोशिंदा जेव्हा आपल्यातून निघून जातो तेव्हा निर्माण होणार्या विपरीत परिस्थितीमध्ये केवळ दुःख व्यक्त करत बसणे हा पर्याय नसतो. त्या व्यक्तीच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. असाच प्रयत्न अजित स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून बीडचा पत्रकार संघ करत आहे असे प्रतिपादन शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा बीडच्या वतीने प्रत्येक महिन्याला आयोजित करण्यात येत असलेल्या अजित स्मृती व्याख्यानमालेचे सहावे पुष्प अर्पण करण्यासाठी श्रीमती मेटे यांना निमंत्रीत करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर, रोटरी क्लबचे सहाय्यक प्रांतपाल कल्याण कुलकर्णी, अ.भा.सराफ सुवर्णकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मंगेश लोळगे,सायं.दै.महाराष्ट्र आरंभचे संपादक दिपक थोरात,प्राचार्या प्रांजली काळे,जेष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ.गणेश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्यालय प्रमुख भागवत तावरे यांनी केले. या प्रसंगी बोलतांना ज्योतीताई मेटे यांनी अजितदादा आणि विनायकराव मेटे यांचे राजकारणापलीकडचे कौटुंबिक प्रेमाचे नाते होते आणि प्रशासकीय दराराही तेवढाच होता अशा अनेक प्रसंगाला उजाळा देताना, दादांना घड्याळाची मोठी आवड होती आणि मेटे साहेब ती जपतही होते. बाहेर कुठे गेली की दोन-चार घड्याळ घेऊन यायचे आणि भेटीत ते दादाला द्यायचे, तुम्हाला कोणते आवडते असे दादा विचारून एक आपल्यासाठी ठेवायचे. त्यांनी मैत्रीचे नाते खूप जपले, अनेक वेळा कुटुंबाकडे दुर्लक्ष करून मेटे साहेब पक्षकार्यात जास्त व्यस्त होत असत तेव्हा प्रेमाच्या धाकाने बोलणारे दादाच होते,प्रशासनात मात्र ते वेगळे होते, दरारा, धाक, कडकशिस्तीचा बाणा आणि तेवढेच सर्व दूर त्यांचे बारकाईने लक्षही असे. कोरोना काळातील प्रशासकीय अधिकारी आढावा बैठका ऑनलाईन होत असत, दादाचा आढावा घेणे म्हणजे कडकशिस्तीचे बोलणे असायचे, तो प्रेमाचा दरारा होता, एका बैठकीत प्रत्येकाच्या टेबलवर प्लास्टिकच्या पाणी बॉटल कडे लक्ष वेधत फक्त नाशिक विभागासमोर स्टीलची पाणी बॉटल दिसते आहे. याकडे सर्वांचे लक्ष वेधले आणि तेव्हापासून दादाच्या बैठकीत शासन प्रशासन बैठकीत स्टीलच्या पाणी बॉटल चा वापर सुरू झाला आहे ही केवळ आठवण म्हणून ज्योतीताईंनी आपल्या प्रशासकीय कारकीर्दीतील सांगितले नव्हे तर पर्यावरण पूरकता पाणी महत्त्व आणि आरोग्याची काळजी अशा अत्यंत बारीक गोष्टीकडे दादांचे तेवढेच लक्ष असायचे ही आठवण,सोबत मेटे ताईची दुरुदृष्टी लक्षात येवून जाते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले. या कार्यक्रमात स्व.अजित दादांचे चित्र रंगवणार्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. तसेच पत्रकार संघाच्या नवीन पदाधिकार्यांचे स्वागत करण्यात आले.

# ६१ शिपाई झाले आरोग्यसेवक ; बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी मानले मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांचे आभार..!

**अंबाजोगाई :** सध्या जिल्हा परिषद बीड प्रशासन होय आज जिल्हा परिषद बीड येथील प्रत्येक चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या तोंडुन फक्त हे एकच वाक्य कानी पडत आहे, ते म्हणजे धन्यवाद.. ! जितीनजी रहमान साहेब धन्यवाद.. ! धन्यवाद.. जिल्हा परिषद प्रशासन बीड. त्याचं कारणही तसंच आहे, दिनांक २७ जुलै रोजी बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने पदोन्नती प्रक्रिया पार पडली, त्यातुन ६१ शिपायांना आरोग्य सेवक पदांवर पदोन्नती देण्यात आली, त्यामुळे बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी बीड येथे एकत्रित येऊन सत्कार करून मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्रदिप काकडे (उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद बीड), उल्हास गंडाळ (जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, बीड) यांचे आभार मानले आहेत.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, जितीन रहमान हे दिनांक १९ जुन २०२५ रोजी जिल्हा परिषद वर्धा येथून जिल्हा परिषद बीड येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर रूजू झाले अन् बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे नशीबच पालटले, एव्हाना त्यांच्या जीवनमानातच कायापालट झाला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण, राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाकडुन दिनांक ७ मार्च २०२४ रोजी कनिष्ठ सहाय्यक पदांचे सेवा प्रवेश नियमांत बदल करून परिचर वर्ग-४ पदांवरून कनिष्ठ सहाय्यक वर्ग-३ पदांवर पदोन्नतीचे प्रमाण ४०:५०:१० करण्यात आले होते. अधिसूचना निर्गमित होऊन जवळपास सव्वा वर्षे उलटून गेले होते. महाराष्ट्रातील जवळपास तीस जिल्हा परिषदांमध्ये या अधिसुचनेनुसार एकूण २५०० परिचरांना कनिष्ठ सहाय्यक पदांवर पदोन्नतीची संधी मिळाली होती. परंतु, ज्या जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी हि अधिसुचना निर्गमित व्हावी यासाठी जिवाचे रान केले होते त्याच जिल्ह्यातील परिचरांना या अधिसुचनेनूसार पदोन्नती मिळत नव्हती. त्यामुळे बीड जिल्हयातील परिचर वर्ग-४ कर्मचारी अतिशय निराशाजनक परिस्थिती मध्ये नौकरी करीत होता. परंतु, दिनांक १९ जुन २०२५ मध्ये जितीन रहमान हे मुख्य कार्यकारी पदावर रूजु झाले अन् केवळ दोनच महिन्यांत सुरूवातीला १६ परिचरांना कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नतीची संधी मिळाली, त्यानंतर लगेचच २०२६ नवीन



वर्षांच्या पुर्वसंध्येला पुन्हा एकदा ३ वाहनचालक व ३६ परिचरांना पदोन्नतीने तर वाहनचालकांना समायोजनांने कनिष्ठ सहाय्यक पदावर काम करण्याची संधी मिळाली. हि पदोन्नती प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा परिषद बीडचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप काकडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनिल नवले, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक श्री सचिन सर, बीडकर सर तसेच पदोन्नती विभागाचे वरिष्ठ सहाय्यक श्रीमती आमले मॅडम व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची आस्थापना सांभाळणारे श्री सावंत सर या सर्व मान्यवरांचे देखील मोलाचे सहकार्य संघटनेला लाभले. अशी प्रतिक्रिया परिचर कर्मचाऱ्यांमधून ऐकावयास मिळत आहे. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटना व राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबई यांच्या संयुक्त प्रयत्नाने जिल्हा परिषदेकडील परिचर वर्ग-४ कर्मचारी यांना आरोग्यसेवक वर्ग-३ पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध झाली. याकामी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व भारतीय जनता पार्टीचे विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय या मान्यवरांचे विशेष सहकार्य लाभले, भाऊसाहेब पठाण, मुकुंद विनायकराव तुरे यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पुन्हा एकदा जिल्हा परिषदेकडील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या जीवनांत आनंद निर्माण झाला,

दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने आरोग्यसेवक पदाचे सेवा प्रवेश नियम निर्गमित केले. ज्यामध्ये जिल्हा परिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना एकूण मंजुर पदांच्या २५ टक्के पदे हि पदोन्नती करिता उपलब्ध झाली. त्यानुसार महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा परिषदांमध्ये पदोन्नतीची प्रक्रिया सुरू झाली. मराठवाड्यातील परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, तर उत्तर महाराष्ट्रातील अहिल्यानगर, नाशिक, विदर्भातील वाशिम, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा अशा अनेक जिल्हा परिषदांमध्ये परिचर वर्ग-४ पदांवरून आरोग्यसेवक वर्ग-३ पदांवर पदोन्नतीची प्रक्रिया पार पडत होती. या सर्व घडामोडी मध्ये बीड जिल्ह्यात देखील महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर पवार, जिल्हा सचिव महेश रोकडे व कार्याध्यक्ष आत्माराम गायवळ यांच्या वतीने जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना परिचर वर्ग-४ कर्मचाऱ्यामधुन आरोग्यसेवक वर्ग-३ पदावर एकूण पदांच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती करणे बाबत प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

या भेटी दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पदोन्नती संदर्भातील तांत्रिक बाबी पुर्ण करुन ४५ दिवसांच्या आत परिचर वर्ग-४ पदावरून आरोग्यसेवक वर्ग-३ पदावर पदोन्नती करण्याबाबतचा शब्द संघटनेला दिला होता अन् तो शब्द केवळ ४० दिवसांतच जितीन रहमान (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड) यांनी पाळला. त्यानुसार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी परिचर वर्ग-४ कर्मचाऱ्यांमधून आरोग्यसेवक पदांवर पदोन्नती घेऊ इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली तर ज्यांनी आरोग्यसेवक पदांवर पदोन्नती घेण्यास सहमती दर्शविली होती. ज्यांनी आपापली कागदपत्रे जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागांकडे तात्काळ जमा केली होती अशा एकुण ९१ कर्मचाऱ्यांची दिनांक ३ जुलै २०२६ रोजी कागदपत्रे पडताळणी करण्यात आली, अन् दिनांक २२ जुलै २०२६ रोजी जितीन रहमान (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड) यांच्या मुख्य उपस्थिती मध्ये अतिशय पारदर्शक पध्दतीने पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या ७० परिचरांचे समुपदेशन घेऊन त्यांना पदस्थापना देण्यात आली,

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## विवो इग्नाइट 2026ला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी दिल्ली, २९ जुलै, २०२६:** विवो इंडियाने आज जाहीर केले की, शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या त्यांच्या विशेष देशव्यापी नवोन्मेष कार्यक्रम, विवो इग्नाइट २०२६ ला ३८,००० हून अधिक नोंदणी मिळाली आहे, ज्यामुळे ही आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरली आहे. यावर्षी, विवो इग्नाइट २०२६ साठी १२,००० हून अधिक शाळा, ७०५ जिल्हे आणि ४,५०० हून अधिक शहरांमधून नोंदणी झाली. सर्व २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधील, तसेच ९२ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली. ही आकडेवारी देशभरातील तरुण विद्यार्थ्यांमध्ये वास्तविक जीवनातील आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत वाढत असलेला उत्साह आणि आवड दर्शवते. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ६,१०० हून अधिक कल्पना सादर केल्या. या कल्पनांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता. मागील आवृत्तीच्या तुलनेत, व्हिवो इग्नाइटची व्याप्ती वाढली आहे; ६६८ जिल्हे आणि ३,००० हून अधिक शहरांमधील ९,००० हून अधिक शाळांमधून ते ७०५ जिल्हे आणि ४,५०० हून अधिक शहरांमधील १२,००० हून अधिक शाळांपर्यंत पोहोचले आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतात ऑल-न्यू हायलक्स चे लॉन्च केले

**जयपूर:** टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज आयकॉनिक ऑल-न्यू हायलक्स चे लॉन्च जाहीर केले, ज्यामुळे भारतातील एसयूव्ही पोर्टफोलिओ अधिक मजबूत झाला आहे. टोयोटाच्या वारशातील विश्वासार्हता, टिकाऊपणा आणि गुणवत्ता यांचे प्रतीक असलेला नववा जनरेशन हायलक्स दमदार ड्युरेबिलिटी आणि सदैव तयार असलेली क्षमता यांचा संगम आहे, ज्यामुळे बहुपयोगी परफॉर्मन्स मिळतो.आयएमव्ही प्लॅटफॉर्मवर आधारित ऑल-न्यू हायलक्स सर्वांगीण वापरासाठी विकसित करण्यात आली आहे. ती हेवी-ड्युटी कामांसाठी अत्यंत टिकाऊ असून शहरी ड्रायव्हिंगसाठी आरामदायी आणि हलक्या ॲडव्हेंचर ड्रायव्हिंगसाठी सक्षम आहे. ही लवचिकता टोयोटाच्या "मोबिलिटी फॉर ऑल" या वचनबद्धतेला अधिक बळकट करते आणि विश्वासार्हतेमुळे ग्राहकांशी दीर्घकालीन नातेसंबंध दृढ करते.

## पैसाबझारचा मोफत क्रेडिट स्कोअर कार्यक्रम 60 दशलक्ष ग्राहकांपर्यंत पोहोचला आहे

**मुंबई :** भारतातील आर्थिक उत्पादनांसाठीचे अग्रगण्य मार्केटप्लेस असलेल्या पैसाबझारने आज जाहीर केले की, ६० दशलक्षाहून अधिक ग्राहकांनी आता त्यांच्या प्लॅटफॉर्मवर आपला मोफत क्रेडिट स्कोअर तपासला आहे. ८५० हून अधिक शहरांमधील आणि गावांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचणे, हे क्रेडिट जागरूकता वाढवणे, क्रेडिटची उपलब्धता विस्तारणे आणि लाखो लोकांना क्रेडिट-फिट बनण्यास मदत करण्याच्या पैसाबझारच्या दशकाहून अधिक काळाच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. २०१७ मध्ये आपला मोफत क्रेडिट स्कोअर प्लॅटफॉर्म सुरू केल्यापासून, पैसाबझारने प्रत्येक भारतीयासाठी क्रेडिट माहिती सोपी, सुलभ आणि उपयुक्त बनवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. पैसाबझार प्लॅटफॉर्मवर, ग्राहक चारही क्रेडिट ब्युरोमधील त्यांचे क्रेडिट स्कोअर अनेक भारतीय भाषांमध्ये, विनामूल्य आणि त्वरित पाहू शकतात, ज्यामुळे हे देशातील सर्वात व्यापक क्रेडिट जागरूकता प्लॅटफॉर्मपैकी एक बनले आहे.

## पीसीआय भागीदारी अधिक मजबूत

**मुंबई :** एसबीआय लाईफ इन्शुरन्सने पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडियासोबत (पीसीआय) भागीदारी अधिक मजबूत करत २०२६ च्या पॅरा स्पोर्ट्स सीझनसाठी भारतीय पथकाचा 'प्रिन्सिपल पार्टनर' होण्याची घोषणा केली. तसेच, ग्लासगो कॉमनवेल्थ पॅरा गेम्स २०२६ आणि जपानमधील आयची-नागोया आशियाई पॅरा गेम्स २०२६ साठी भारतीय पथकाचा 'ऑफिशियल लाईफ इन्शुरन्स पार्टनर' म्हणूनही कंपनी काम करणार आहे. पॅरिस २०२४ पॅरालिम्पिकमधील यशस्वी सहकार्याचा विस्तार करत एसबीआय लाईफ पॅरा-खेळाडूंच्या जिद्द आणि उत्कृष्टतेला सातत्याने पाठबळ देत आहे.

## विक्रमी प्री-ऑर्डर्सची नोंद

मुंबई - सॅमसंगचे ८ व्या जनरेशनचे फोल्डेबल स्मार्टफोन्स गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलेक्सी झेड फोल्ड८ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांनी प्री-ऑर्डरचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत, ज्यामुळे फोल्डेबल तंत्रज्ञानाचा मुख्य प्रवाहात आलेला वापर आणि भारतातील अभूतपूर्व ग्राहक उत्साह अधोरेखित होतो. भारतात २२ जुलै रोजी लाँच झाल्यानंतर अवघ्या ७२ तासांच्या आत या नवीन डिवाईसेससाठी २,७१,००० हून अधिक प्री-ऑर्डर्सची नोंद झाली. गेल्या वर्षी, सॅमसंग इंडियाला आपल्या गॅलेक्सी झेड फोल्ड७ आणि झेड फ्लिप७ साठी अशीच प्री-ऑर्डर संख्या मिळवण्यासाठी १५ दिवस लागले होते. गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलेक्सी झेड फोल्ड८ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे,

## बायरकडून ट्रान्स सादर

मुंबई – बायरने आज 'ट्रान्स' या नावीन्यपूर्ण कीटकनाशकाची बाजारातील प्रवेशाची घोषणा केली. हे कीटकनाशक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी अशा रस शोषणाऱ्या कीट समूहांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरेल. एकाच उत्पादा मध्ये दोन प्रभावी कार्यपद्धती एकत्र करून 'ट्रान्स' व्यापक नियंत्रण देते, ज्यामुळे पिकांचे आरोग्य सुधारते आणि पिकाची उत्पादकता व शेतकऱ्यांचा नफा वाढतो. हे उत्पादन जुलै २०२६ पासून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब आणि हरियाणा अशा प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल.

# गुरुवर्य अक्का महाराज यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमेनिमित्त श्री क्षेत्र वेरूळ मच्छिंद्रनाथ आश्रम येथे हजारो भाविक भक्तां मी घेतले आशीर्वाद

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी :** श्री क्षेत्र वेरूळ येथील मच्छिंद्रनाथ आश्रम सद्गुरु अक्का महाराज वेरूळ. बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिराच्या पवित्र येळगंगा नदीच्या सानिध्यात असलेले विविध आश्रम, मठ आणि मंदिरामध्ये गुरु पौर्णिमे निमित्त भक्तांची मांदियाळी बघावयास मिळाली. यावेळी पहाटेपासूनच भक्तांनी गुरु महिमा जाणत आपापल्या गुरुंकडे जाऊन सेवा व गुरु पौर्णिमे निमित्त गुरु पूजन करून आशीर्वाद घेतला.



सद्गुरु अक्का महाराज मच्छिंद्रनाथ आश्रम प्रमुख वेरूळ यांच्या उपस्थितीत भाविक भक्तांनी मोठ्या उत्साहात गुरु पौर्णिमा विविध धार्मिक कार्यक्रम विधी पूजा गुरु स्नान मच्छिंद्रनाथ बाबांचा महा अभिषेक करण्यात आला याप्रसंगी गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे खुलताबाद पंचायत समितीचे माजी सभापती तथा पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे उद्योजक शेख नाथ पाटील नागे उद्योजक इसराम मातकर पाटील विलास भाऊ सोळुंके. ह भ प नारायण भांबर्डे ह भ प तुकाराम मते कैलास मिसाळ संतोष करपे श्रीमती कल्पना कदम राजू काका मनीठे सतीश लोखंडे दामू अण्णा गवळी भागचंद बोरसे नारायण भोकरे. गायनाचार्य सारंधर साबळे राम शेळके रमेश दादा ठोंबरे प्रताप भोसले चंद्रकांत कुबेर संतोष अग्रवाल मेहक अग्रवाल विठ्ठल आहेर ह भ प शांताराम काळे. सुरेंद्र पोफळे गणेश गायके पुजाराम धोत्रे अरुण कदम योगेश राजपूत वाघराळ भगवान वाघराळ आदींच्या उपस्थितीत संपन्न झाला. विविध ठिकाणाच्या तीर्थस्थळाच्या पवित्र नदी चे पाणी आणून सद्गुरु अक्काताई महाराज यांचे पूजन केले. तसेच नाथ भक्त परिवारातील तरुण युवकांनी श्रीक्षेत्र मढी ते श्रीक्षेत्र वेरूळ या दरम्यान पायी दिंडी करीत कावड यात्रेमध्ये पाणी आणून भगवान मच्छिंद्रनाथाला जलाभिषेक केला.

# श्री विठोबा बालाजी महाराज संस्थानच्या 167 व्या सप्ताहास प्रारंभ



तभा वृत्तसेवा,

**गंगापूर दि.३०:** गंगापूर येथील श्री विठोबा बालाजी महाराज संस्थानच्या १६७ व्या अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवारी (दि.३०) प्रारंभ झाला.

श्री विठोबा बालाजी महाराज, गंगापूर यांच्या आशिर्वादाने ह.भ.प. गुरूवर्य भास्करगिरीजी महाराज, श्री क्षेत्र देवगड यांच्या कृपाशिर्वादाने सालाबादप्रमाणे याही वर्षीअखंड हरीनाम सप्ताहास प्रारंभ झाला. सप्ताहाचे दैनंदिन कार्यक्रमात दि.३०/०७/२०२६ रोजी गुरूवारपहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ०९.०० ते ११.०० गाथा भजन, सायं. ०६ ते ०७ हरिपाठ व रात्री ०९ ते ११ भजन राहणार आहे.दररोज ह.भ.प. अंबऋषी महाराज बार्शीकर व त्यांचे विद्यार्थी हरिपाठ हरिपाठ सायं. ०६ ते ०७ वाजता होणार आहे.बुधवारी ( दि.५) ह.भ.प. गुरूवर्य भास्करगिरीजी महाराज (श्री क्षेत्र देवगड संस्थान)यांचे प्रवचन सकाळी १०.०० ते ११.०० होणार आहे.गुरूवार,दि.०६/०८/२०२६ रोजी सकाळी ०९ ते ११.०० वा. पाणी मिरवणुक (नगर प्रदक्षिणा) रात्री १०.०० ते १.०० पालखी मिरवणुक होईल.गुरूवार, दि.०६/०८/२०२६ रोजी दु.१२ ते २वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम माहेश्वरी मंगल कार्यालय येथे होणार आहे. सप्ताहातील सर्व कार्यक्रम गंगापूर व पंचक्रोशीतील सर्व गुणीजन भजनी मंडळी, वारकरी, गायक व टाळकरी यांच्या सहकार्याने पार पडतील, या कार्यक्रमास सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे श्री विठोबा बालाजी महाराज संस्थान, गंगापूरच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका क्रीडा स्पर्धांचे नियोजन

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.३० जुलै :** तालुका क्रीडा स्पर्धा २०२६-२७ च्या यशस्वी आयोजनासाठी नियोजन बैठक जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या बैठकीस संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



बैठकीत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक, आयोजनाची रूपरेषा,स्पर्धा सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन तसेच विविध शाळा व महाविद्यालयांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी तालुका क्रीडा संयोजक तथा क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर यांनी सन २०२६-२७ मधील तालुका क्रीडा स्पर्धांचे सविस्तर नियोजन उपस्थितांसमोर मांडले. त्यांनी स्पर्धा पारदर्शक,दर्जेदार व खेळाडूकेंद्रित पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या.नुकतीच जिल्हा क्रीडा अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल मुकुंद वाडकर यांचा संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच क्रीडा अधिकारी यादव यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याचप्रसंगी तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षकांच्या वतीने गोबरा राठोड यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

बैठकीस तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांचे क्रीडा शिक्षक,प्रतिनिधी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी तालुक्यातील क्रीडा चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले.

# श्री संत गजानन महाराज मंदिर पालोद येथे तिरुपती ग्रुप सिल्लोडतर्फे महाप्रसाद भंडारा उत्साहात संपन्न



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.३० जुलै :** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त तिरुपती ग्रुप सिल्लोड यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री संत गजानन महाराज मंदिर,पालोद येथे भव्य महाप्रसाद (भंडारा) आयोजन करण्यात आले होते.या धार्मिक कार्यक्रमास भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभला.संपूर्ण पालोद गाव व परिसरातील भक्तानी महाप्रसादाचा लाभ घेतला.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.सकाळपासूनच भाविकांनी श्री गजानन महाराजांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिरुपती ग्रुप सिल्लोडचे सदस्य व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी तिरुपती ग्रुपचे सर्वश्री ललित फेरवाणी,प्रदीप ठाकरे,संजय बागुल,संजय दळवी,राजेंद्र बोधेकर,नरेंद्र खंडेलवाल,विलास पाटील,गोविंद तलरेजा,हरीश खंडेलवाल,गोपाल अनवेकर,राजू शेठ अग्रवाल यांनी नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडली.

तसेच श्री संत गजानन महाराज संस्थान पालोदचे ग्रामस्थ गजानन पालोदकर,पंडित पालोदकर,उमाकांत पालोदकर, विष्णू उघडे,समाधान सोने,सतीश सोनवणे,त्रिंबक हिवरे, दशरथ सपकाळ,गणेश सपकाळ तसेच समस्त गावकरी मंडळी यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.तसेच संस्थानचे विश्वस्त यांनी तिरुपती ग्रुप,सिल्लोड सर्व सदस्य यांचे रुमाल टोपी व महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला या प्रसंगी संजय बागूल यांनी पुढील वर्षी गुरू पौर्णिमेला भव्य असे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येईल असे ग्रुप च्या वतीने जाहीर केले आहे.

# रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा

## रोहित देशपांडे अध्यक्ष, अनुराग सावे उपाध्यक्ष; श्याम आंभोरे सचिव, डॉ. केजल भारसाखळे सहसचिव

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात रग्बी खेळाचा सर्वांगीण विकास, तळागाळातील प्रतिभावान खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीने "मिशन रग्बी छत्रपती संभाजीनगर" या महत्त्वाकांक्षी संकल्पनेद्वारे जिल्ह्यात रग्बी खेळाला नवी दिशा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.






रग्बी असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर ही रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (RAM) संलग्न अधिकृत जिल्हा संघटना असून, RAM ही भारतीय रग्बी फुटबॉल युनियन (IRFU), भारत सरकारचे युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारतीय ऑलिम्पिक संघटना (IOA), एशिया रग्बी आणि वर्ल्ड रग्बी यांच्याशी संलग्न व मान्यताप्राप्त संस्था आहे.

असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक रोहित देशपांडे, उपाध्यक्षपदी उद्योगपती अनुराग सावे, सचिवपदी रग्बी प्रशिक्षक श्याम आंभोरे, सहसचिवपदी महिला क्रीडा संघटक डॉ. केजल भारसाखळे आणि कोषाध्यक्षपदी पूनम आंभोरे यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून पंकज भारसाखळे, रवींद्र आंभोरे, सतीश साळवे, ऋषिकेश आंभोरे, सचिन देकळे आणि नितीन साळवे यांची निवड करण्यात आली.

नव्या कार्यकारिणीने ग्रासरूट स्तरावर रग्बीचा प्रसार, शालेय व महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन, प्रशिक्षक व पंच प्रशिक्षण, महिला रग्बीला विशेष प्रोत्साहन, युवा प्रतिभा शोध मोहीम, राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन तसेच आधुनिक प्रशिक्षण पद्धतींचा अवलंब यावर विशेष भर देण्याचे जाहीर केले आहे.

"प्रत्येक शाळेत रग्बी – प्रत्येक खेळाडूला संधी" या संकल्पनेतून दर्जेदार प्रशिक्षण, स्पर्धात्मक वातावरण आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याचा संकल्प नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगरला महाराष्ट्रातील अग्रगण्य रग्बी केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षक, माजी खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी यांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आगामी काळात जिल्हाभर विविध नाविन्यपूर्ण आणि विकासाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### एन-2 सिडकोतील श्री रामनगर सेवा केंद्रात गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय वातावरणात; दोन हजार स्वामीभक्तांनी केले गुरुपूजन

# अखंड नामस्मरण, गुरुपूजन, ग्रंथपारायण व महाप्रसाद

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, दिंडोरी प्रणित अंतर्गत एन-२ सिडको येथील श्री रामनगर (विठ्ठल नगर) सेवा केंद्रात गुरुपौर्णिमा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास सुमारे दोन हजार स्वामीभक्त, सेवेकरी, महिला, युवक तसेच बालसंस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६.३० वाजता पंचोपचार, षोडशोपचार व गुरुपूजनाने झाली. सकाळी १०.३० वाजता महा नैवेद्य आरती संपन्न झाली. त्यानंतर रात्री ८ वाजेपर्यंत भाविकांनी गुरुपूजनाचा लाभ घेतला. दिवसभर अकरा माळी श्री स्वामी समर्थ नामजप, श्री स्वामीचरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण तसेच अखंड नामस्मरण करण्यात आले. "श्री स्वामी समर्थ" या नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. आकर्षक फुलसजावटीमुळे सेवा केंद्रात आध्यात्मिक आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी सेवा केंद्राचे प्रमुख शिवाजी वाघमारे यांनी सेवामार्गाचे महत्त्व स्पष्ट करताना, "सेवामार्ग हा ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के अध्यात्म या तत्त्वावर आधारित असून समाजसेवेतूनच ईश्वरसेवा घडते," असे प्रतिपादन केले. निस्वार्थ सेवा, नामस्मरण, संस्कार आणि समाजहित यांचा अंगीकार करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

गुरुपौर्णिमेनिमित्त उपस्थित हजारो सेवेकऱ्यांनी परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराजांना गुरुस्थानी स्वीकारून दररोज ११ माळी नामजप करण्याचा तसेच श्री स्वामीचरित्र सारामृत ग्रंथातील सलग तीन अध्यायांचे नियमित वाचन करण्याचा सामूहिक संकल्प केला. गुरुकृपेने आत्मिक उन्नती साधत समाजसेवा अधिक प्रभावी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सेवा केंद्रातील सर्व सेवेकऱ्यांनी नियोजनबद्ध सेवा बजावली. समारोपानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. सुमारे दोन हजार भाविकांनी गुरुपूजनाचा लाभ घेत श्रद्धा, सेवा, संस्कार आणि समाजहिताचा संदेश देणारा गुरुपौर्णिमा महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# भाजप युवा मोर्चा पूर्व जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश राठोड,व जिल्हा चिटणीसपदी ऋतिक धर्मे यांची निवड



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि ३० जुलै :** भारतीय जनता युवा मोर्चा पूर्व जिल्हा उपाध्यक्षपदी बिडकीन येथील अविनाश राठोड ग्रामपंचायत सदस्य यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली तर ऋतिक अशोक धर्मे यांची जिल्हा चिटणीसपदी निवड झाली, पूर्ण जिल्हाध्यक्ष ऋषी नरवडे यांनी निवड केली, बिडकीन भाजप मंडळ अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी झाल्या आहे, अविनाश राठोड व ऋतिक अशोक धर्मे यांची निवड झाल्याने यांचा सत्कार करण्यात आला यावेळी भाजप मंडळ अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, सरपंच अशोक धर्मे, उपसरपंच किरण गुजर, सरपंच ज्ञानेश्वर रहाटवाडे, उत्तम धर्मे, ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे, मोहन हिवाळे,भागवत ठाकूर, निकेश राऊत, निलेश धडे ,अजय राठोड, आदींची उपस्थिती होती

# मराठवाड्यासाठी समन्यायी पाणी वाटपाची मागणी; 15 सप्टेंबरपासून धरणे आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** दि.३० जुलै - मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त व अल्पवृष्टीग्रस्त भागाला समन्यायी पद्धतीने पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पार-गोदावरी नदीजोड योजना, कोकणातील उधळस व वैतरणा खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे पाणी मराठवाड्याकडे वळविणे तसेच मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीने केली आहे. यासंदर्भातील निवेदन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दत्तात्रय पाटील,प्रकाश आहेर, डॉ. सदाशिव पाटील व अशोक दाबके,कडूबा कुमावत, अरुण बोगाने यांनी सादर केले.



निवेदनात पार-गोदावरी नदीजोड योजनेद्वारे पश्चिम वाहिनीचे समुद्रात जाणारे पाणी अडवून मराठवाड्याकडे वळविल्यास छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोलीसह दुष्काळग्रस्त भागातील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो, असा दावा करण्यात आला आहे. सन २०१०-११ पासून मराठवाड्यासाठी आरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

तसेच मराठवाड्याचे स्थलांतरित मुख्य अभियंता कार्यालय पुन्हा छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करावे, पार-गोदावरी नदीजोड योजना, दमणगंगा नदीजोड योजना तसेच उधळस व वैतरणा खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे पाणी अडविण्याच्या प्रस्तावांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

समितीने शासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देत संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्याची मागणी केली आहे. तसेच दि. १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यास दि. १५ सप्टेंबरपासून विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे शेतकऱ्यांच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

**प्रमुख मागण्या :** सन २०१०-११ पासून मराठवाड्यासाठी आरक्षित पाणी तातडीने उपलब्ध करावे. मुख्य अभियंता (जलसंपदा) कार्यालय पुन्हा छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करावे. पार-गोदावरी नदीजोड, दमणगंगा नदीजोड व पश्चिम वाहिनी पाणी वळविण्याच्या योजनांवर तातडीने कार्यवाही करावी. १५ दिवसांत संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन निर्णय जाहीर करावेत.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.वि.द. पाटील साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्रमांक: ३०२ / २०२६ — पुढील तारीख ०७/०९/२०२६

अर्जदार : १) विजयाबाई भ्र. उत्तमराव बोडखे, वय ७१ वर्ष, धंदा घरकाम रा- अंतापुर, जैतापुर, ता- कन्नड जि- औरंगाबाद, २) वैशाली भ्र. राजेंद्र सपकाळ, वय-४७ वर्ष, धंदा घरकाम रा-जळगाव सपकाळ, ता-भोकरदन जि- जालना. ३) गितांजली भ्र. नरेंद्र शिंदे, वय- ४० वर्ष, धंदा घरकाम रा- सर्वे नं ५२/५ पी नं. ८ शिवनेरी कॉलनी गारखेडा परीसर ता. जि- औरंगाबाद. ४) साधना भ्र. रविंद्र थेटे, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा- वळदगाव, बेलापुर ता.जि- अहमदनगर. ५) शितल भ्र. शरद चोंधे, वय ३७ वर्ष, धंदा-घरकाम रा सर्वे नं ५२/५ पी नं.८ शिवनेरी कॉलनी, गारखेडा परीसर नियर राजे चौक ता.जि औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ पी.एस. जाधव यांच्यामार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे मौजे अंतापुर, जैतापुर ता- कन्नड जि- औरंगाबाद. येथील कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क्र.२ ते ५ ह्या मुली असल्याने त्या वरील पत्त्यावर त्यांच्या सासरी राहतात. अर्जदार क्र. १ ही मयत उत्तम रामकृष्ण बोडखे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ५ ह्या मुली आहे, मयताचे आई वडील हे यापूर्वीच मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ हीचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत उत्तम रामकृष्ण बोडखे हे होते, ते अल्पशा आजाराने दिनांक २०/०८/२०२४ रोजी मौजे अंतापुर ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. सोबत त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. हे, की, मयत उत्तम रामकृष्ण बोडखे यांना अर्जदार क्र. १ ते ५ यांच्याशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाही, अर्जदार यांना मयत उत्तम रामकृष्ण बोडखे यांना मिळणारा शासकीय, निमशासकीय, लाभघेण्यासाठी अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. अर्जदार यांना मयत उत्तम रामकृष्ण बोडखे यांची शेती ही मौजे अंतापुर ता. कन्नड येथे असल्याने अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र हे शासकीय, व निमशासकीय, तसेच तलाठी कार्यालयात महसुल दप्तरी, तसेच ग्रामपंचायत कार्यालयात वारसांची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनांचे लाभ घेण्यासाठी, वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदार हे वारसप्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिका-यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र दिनांक १९/०६/२०२६ रोजी घेवुन येण्याचे सांगितल्यावरून सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसप्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (३०) दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०७/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५८/२०२६

१/- शामकांत रंगनाथ लोखंडे, वय ५१ वर्ष, धंदा शेती, रा. जवळा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- सुनिल रंगनाथ लोखंडे, वय ४९ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- अनिल रंगनाथ लोखंडे, वय ५१ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रंगनाथ संपत लोखंडे यांचा दि. २७.०४.२००७ रोजी मौजे जवळा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला आहे तसेच मयत विमलबाई रंगनाथ लोखंडे यांचा दि. २२.०१.२०२५ रोजी मौजे जवळा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन दोघाच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत यत रंगनाथ संपत लोखंडे व विमलबाई रंगनाथ लोखंडे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. २९.०७.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ०९.०९.२०२६

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# धोका अद्याप संपलेला नाही...

माओवादी चळवळीच्या बाबतीत काही बातम्या समोर आल्या आहेत. त्यातील काही दिलासा देणाऱ्या, तर इतर काळजी वाढवणाऱ्या आहेत. झारखंडमध्ये १६ माओवाद्यांनी शरणागती पत्करली असल्याची एक बातमी. दुसरी बातमी- माओवादी चळवळीतील शेवटचा सक्रिय नेता मिसिर बेसरा याला झारखंडच्या गिरिडिह येथे मंगळवारी सायंकाळी अटक करण्यात आली. अन्नपाण्यावाचून जंगलात कोंडी होत असल्याने त्याच्या अंगरक्षकांसह एकूण २४ जणांनी त्याची साथ सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे तो काहीसा एकाकी पडला होता. त्यातली तिसरी बातमी माओवादाचा धोका कायम असल्याचे सांगणारी आहे. एकीकडे नक्षलवादाचा निःपात दृष्टिपथात असल्याच्या गृहीतकावर वाटचाल सुरू झालेली असताना, महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेवर माओवाद्यांची पुन्हा जमवाजमव होत असल्याचे संकेत देणारे वृत्त काळजी वाढविणारे आहे. यासंदर्भात पुढे येत असलेली माहिती खरी असल्यास केंद्र आणि राज्यांनी आजवर राबवलेल्या कठोर मोहिमांच्या यशापुढे प्रश्नचिन्ह उभे राहणार आहे. शिवाय, आतापर्यंत शरणागती पत्करलेल्या माओवादी नेत्यांबाबत काही प्रश्नही उपस्थित होणारे आहेत. विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी आणि रक्तपात सोडून संविधान हाती घेत सामान्य आयुष्य जगण्याच्या प्रामाणिक उद्देशाने या नेत्यांनी शरणागती पत्करली काय, याची फेरपडताळणी करण्याचा हा प्रसंग आहे. जिवाच्या भीतीने शरणागती पत्करायची, संधी मिळताच शहरी भागांमध्ये माओवादी विचार पेरायचे आणि रक्तपात घडवायचा अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी असल्यास देशात मोठा अनर्थ घडू शकतो, याचा विचार वेळीच करणे गरजेचे आहे. कारण, एका मोठ्या माओवादी नेत्याने शरणागती पत्करण्यापूर्वी कॅडरला पाठवलेल्या पत्रात 'अस्थायी शस्त्रसंधी' असा उल्लेख केला होता. या एका शब्दातच भविष्यातील भूमिका स्पष्ट झाली आहे. धोका संपलेला नाही, असे म्हणायचे ते या पृष्ठभूमीवर.

सध्याची परिस्थिती पाहता माओवादी चळवळीतील बहुतांश मोठे नेते शरणागती पत्करून सुरक्षित आयुष्य जगत आहेत. खालच्या पातळीवरील त्यांचे कॅडर 'बेपत्ता' आहे आणि त्यांच्या एकूण शस्त्रसाठ्यापैकी फार कमी शस्त्रे सुरक्षा दलांच्या हाती लागली आहेत. शिवाय, अलिकडच्या काही आंदोलनांमध्ये माओवादी तत्त्वे दिसून येणे हा काळजीचा विषय आहे. माओवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेतील मोठा धोका आहे. लोकशाही उलथवून टाकण्याच्या उद्देशाने मागील काही दशकांपासून माओवाद्यांकडून रक्तरंजित हिंसाचार सुरू आहे. केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे त्यावर आता निश्चितपणे अंकुश लागला आहे. एकसंध भारताचे तुकडे करण्याचा माओवाद्यांचा उद्देश आहे. माओवादी सत्ता आणण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून लोकांच्या मनात असंतोष निर्माण करायचा आणि त्यासाठी युवा पिढीला लक्ष्य करायचे हे त्यांचे धोरण आहे. जंगलातील माओवाद आणि शहरी माओवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. २००४ मध्ये विविध संघटनांचे एकीकरण झाल्यावर तयार झालेल्या सीपीआय (माओवादी) या संघटनेची घटना आणि इतर चार पुस्तके मंजूर करण्यात आली. या पाच पुस्तकांपैकी 'स्ट्रॅटेजी ॲण्ड टॅक्टिक्स ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन' हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे आहे. माओवाद्यांच्या रणनीतीची नेमकी माहिती या पुस्तकात आहे. याच पुस्तकात शहरी क्षेत्रांत कसे काम करायचे याबाबत मार्गदर्शन आहे. त्यामुळे शहरी माओवाद नावाचा प्रकार अस्तित्वात नाही, असे दावे निरर्थक ठरतात. या पुस्तकात दिलेली माहिती लक्षात घेतल्यास माओवादी संघटना काय करू शकतात याचा अंदाज येतो. माओवादी चळवळ स्वतःला शोषित, वंचित आणि गरिबांच्या हक्कांसाठी लढणारी क्रांतिकारी चळवळ म्हणून दाखविते. मात्र, तिच्या विचारसरणीचा आणि प्रत्यक्ष कृतीचा अभ्यास केला असता तिने सामाजिक न्यायाच्या नावाखाली हिंसक संघर्षाला प्राधान्य दिले हे स्पष्ट होते. युवक, विद्यार्थी आणि कामगारांमध्ये असंतोष निर्माण करून त्यांना सशस्त्र संघर्षाकडे वळवण्याचा प्रयत्न हा माओवादी रणनीतीचा महत्त्वाचा भाग.

विद्यार्थी आणि युवक हे राष्ट्राचे भविष्य मानले जातात. त्यांच्यात ऊर्जा, परिवर्तनाची इच्छा आणि सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता असते. याच ऊर्मींचा उपयोग करून काही कट्टर विचारसरणीच्या संघटना त्यांच्या मनात विद्यमान व्यवस्थेविषयी तीव्र अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. शांततामय लोकशाही मार्गाऐवजी हिंसक क्रांती हाच एकमेव उपाय असल्याचे चित्र रंगवले जाते. कामगार वर्गालाही याच प्रकारे संघटित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्या आर्थिक अडचणी, कमी वेतन, असुरक्षित रोजगार आणि श्रमिक हक्कांशी संबंधित प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून संघर्षाची भाषा वापरली जाते. कामगारांच्या न्याय्य मागण्या हिंसक राजकीय उद्दिष्टांशी जोडल्या गेल्यास त्याचे परिणाम समाजासाठी आणि कामगारांसाठीही घातक ठरू शकतात. न्याय मिळवण्यासाठी कायदेशीर, संघटनात्मक आणि घटनात्मक मार्ग उपलब्ध आहेत. तरीही माओवादी विचारसरणीचे समर्थक असा युक्तिवाद करतात की, शासन व्यवस्था शोषणकारी असल्याने सशस्त्र संघर्ष आवश्यक ठरतो. लोकशाहीवादी देशात ही भूमिका अजिबात स्वीकारता येत नाही. कारण हिंसेतून कुणाचेही भले होत नाही, याची असंख्य उदाहरणे इतिहासात आहेत. भारताची लोकशाही व्यवस्था नागरिकांना निवडणुका, न्यायालये, कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, प्रसारमाध्यमे आणि शांततामय आंदोलनांसारखे अनेक घटनात्मक मार्ग उपलब्ध करून देते. या माध्यमांतून सामाजिक बदल घडवून आणणे अधिक शाश्वत आणि लोकहिताचे असते. त्यामुळे भावनिक आवाहने, दिशाभूल करणारा प्रचार किंवा द्वेषपूर्ण भाषण यांच्या प्रभावाखाली न येता, वास्तव, संवैधानिक मूल्ये आणि मानवी जीवनाचे महत्त्व लक्षात घेऊन निर्णय घेणे ही काळाची गरज आहे. सामाजिक न्यायासाठी काही प्रमाणात संघर्ष आवश्यक असला तरी, तो लोकशाही, संवाद आणि अहिंसेच्या चौकटीत राहूनच अधिक प्रभावी आणि टिकाऊ ठरतो. सरकारने या अनुषंगाने जमिनीवरील वास्तवाकडे लक्ष दिले पाहिजे. माओवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ सुरक्षा दलांवर अवलंबून न राहता कायद्याचे राज्य वास्तवात कसे उतरेल, यावर काम केले पाहिजे. गुप्तचर यंत्रणा बळकट करणे, कायद्यांची निष्पक्ष अंमलबजावणी करणे, हिंसक कारवायांमध्ये सहभागी व्यक्तींवर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे कारवाई करणे, तसेच निरपराध नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि न्यायप्रक्रिया सुरक्षित ठेवणे यासारख्या बाबींकडे अग्रक्रमाने लक्ष द्यावे लागेल. महाविद्यालये, विद्यापीठे आणि विद्यार्थी-कामगार संघटनांमध्ये संवैधानिक मूल्ये, लोकशाही मार्गाने सामाजिक परिवर्तन आणि अहिंसक संघर्ष यांविषयी जागरूकता निर्माण करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. रोजगार, कौशल्यविकास, उद्योजकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी वाढवल्यास कट्टर विचारसरणीचे आकर्षण कमी होऊ शकते. मजबूत लोकतांत्रिक संस्था, सर्व पातळ्यांवर न्यायाचे राज्य, समतोल विकास आणि लोकतंत्रावरील नागरिकांचा विश्वास या सर्वांचा समन्वय असलेले धोरण अधिक प्रभावी आणि टिकाऊ ठरू शकते. माओवाद्यांसारख्या देशविरोधी घटकांना पाठिंबा मिळू नये, यासाठी समाजात जे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे, ते युद्धपातळीवर केले पाहिजे. ते वातावरण निर्माण होईपर्यंत धोका संपलेला नाही आणि नुसता सुरक्षा दलांच्या कारवाईने तो संपणार नाही, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. ■

## तंत्रवेध

# समाजमाध्यमांवर वयोमर्यादा हवी

**डॉ. दीपक शिकारपूर**

आजचे युग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. मोबाईल फोन आणि इंटरनेट ही तशी म्हटली तर फार प्रभावी साधने आहेत. त्यांच्यातील छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे उपयोग केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च आणि वेळ वाचतो आणि वापरकर्त्यांच्या ज्ञानातही भर पडते. इंटरनेटवरील सोशल मीडिया हा जगभरातील नागरिकांच्या आयुष्यातील आणि समाजातील एक महत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे. सोशल नेटवर्किंग हा इंटरनेटच्या महाजालातील परवलीचा शब्द आहे. सोशल मीडियावर असणे आत्ताच्या काळाची अनिवार्य गरज झाली आहे. तिथे नसणे काळाबरोबर नसल्याचे लक्षण मानले जाते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांना आपले विचार, मते, माहिती लोकांपर्यंत पोचवण्याचा एक नवा मार्ग पुढे आला आहे. ब्रिटनने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर निर्बंध घालण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलियानेही अशाच प्रकारचा निर्णय घेतला होता. यामागील मुख्य कारण म्हणजे सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासावर होणारा वाढता दुष्परिणाम. भारतातही हा विषय अत्यंत महत्त्वाचा बनला आहे, कारण आज अनेक मुलांच्या हातात वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षीच स्मार्टफोन पोहोचत आहे. सोशल मीडिया हे ज्ञान, संवाद आणि सर्जनशीलतेचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचा अतिरेक अनेक गंभीर समस्या निर्माण करतो. मुलांमध्ये व्यसनाधीनता, एकाग्रतेचा अभाव, नैराश्य, चिंता, झोपेचे विकार, सायबर बुलिंग, अश्लील किंवा हिंसक सामग्रीचा संपर्क आणि खोट्या माहितीचा प्रभाव वाढताना दिसत आहे.

अनेक संशोधनांनुसार सततच्या स्क्रीन वापरामुळे मुलांची सामाजिक कौशल्ये आणि प्रत्यक्ष संवाद क्षमता कमी होण्याचा धोका असतो. मात्र भारताची परिस्थिती ऑस्ट्रेलिया किंवा ब्रिटनपेक्षा वेगळी आहे. भारतात लोकसंख्या प्रचंड आहे, डिजिटल साक्षरतेची पातळी असमान आहे आणि कायद्यांची अंमलबजावणी करणे तुलनेने अधिक कठीण आहे. त्यामुळे १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंद करण्याचा निर्णय सत्वर घेणे पुरेसे ठरणार नाही. सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणारा नकारात्मक प्रभाव हे या बंदीमागील सर्वांत मोठ्या कारणांपैकी एक आहे. सायबर बुलिंग, ऑनलाईन शोषण आणि तुलना करण्याची मानसिकता यांसारख्या समस्यांमुळे मुले मानसिक तणावाचा सामना करतात. सोशल मीडियाचे व्यसन ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. मुले तासनतास स्मार्टफोनवर घालवतात. यामुळे शैक्षणिक कामगिरी आणि सामाजिक संबंध प्रभावित होतात. सोशल मीडियावर खोट्या माहितीचा प्रसार होण्याची शक्यता अधिक असते. मुले या खोट्या माहितीवर विश्वास ठेवतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या विचारांवर होतो. सोशल मीडियावर गोपनीयता राखणे कठीण असते. मुलांची वैयक्तिक माहिती चोरली जाण्याचा धोका असतो.

यापुढील काळातील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे वय पडताळणी. सध्या बहुतेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खाते उघडताना फक्त जन्मतारीख विचारली जाते. कोणताही मुलगा किंवा मुलगी चुकीची जन्मतारीख देऊन सहज खाते तयार करू शकते. भारतात 'आधार'सारखी डिजिटल ओळख प्रणाली उपलब्ध असली तरी गोपनीयता, डेटा सुरक्षा आणि तांत्रिक अंमलबजावणी यांचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे केवळ कायदा करून समस्या सुटणार नाही. या बाबतीत भारताने बहुआयामी धोरण स्वीकारण्याची गरज आहे. प्रथम १३ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर कडक निर्बंध असावेत. १३ ते १६ वयोगटासाठी पालकांच्या संमतीची व्यवस्था असावी. दुसरे म्हणजे, सोशल मीडिया कंपन्यांवर अल्गोरिदम पारदर्शकतेची जबाबदारी टाकली पाहिजे. मुलांना व्यसन लावणारी सामग्री, अखंड स्क्रोलिंग, सतत सूचना आणि लक्ष्यित जाहिरातींवर नियंत्रण असावे. तिसरे म्हणजे, शाळांमध्ये डिजिटल साक्षरता स्वतंत्र विषय म्हणून शिकवण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, गोपनीयता, फेक न्यूज, ऑनलाईन फसवणूक आणि डिजिटल जबाबदारी यांचे शिक्षण दिले पाहिजे. फक्त तंत्रज्ञान वापरणे नव्हे, तर तंत्रज्ञानाचा सुज्ञ वापर करणे शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. चौथे म्हणजे, पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा पालकच मुलांना शांत ठेवण्यासाठी किंवा अभ्यासाच्या नावाखाली लहान वयामध्ये स्मार्टफोन देतात. घरामध्ये स्क्रीनटाईमचे नियम, मोबाईलमुक्त जेवण, मोबाईलमुक्त झोपेची वेळ आणि प्रत्यक्ष खेळांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आभासी वास्तव यासारखी तंत्रज्ञाने अधिक प्रभावी होणार आहेत. त्यामुळे मुलांच्या मनावर होणारा प्रभावही अधिक वाढू शकतो. आज योग्य धोरण आखले नाही तर उद्या डिजिटल व्यसन, मानसिक आरोग्य समस्या आणि सामाजिक एकटेपणा यांची मोठी किंमत समाजाला मोजावी लागू शकते. तसेच सोशल मीडियाच्या अनियंत्रित वापरामुळे काही तरुण सायबर गुन्हेगारीकडे आकर्षित होत असल्याचेही दिसून येत आहे. इंटरनेटवर सहज उपलब्ध असलेली हॅकिंगची साधने, बनावट ओळखी तयार करण्याची सुविधा, ऑनलाईन गेमिंग समुदाय, डार्क वेबची माहिती आणि जलद आर्थिक लाभाचे आकर्षण यामुळे काही किशोरवयीन मुले सायबर फसवणूक, खाते हॅकिंग, ओटीपी चोरी, फिशिंग, डिजिटल ब्लॅकमेलिंग आणि डेटाचोरी यांसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी होत आहेत. अनेक वेळा ते आपल्या कृतीचे कायदेशीर परिणाम समजून न घेता केवळ कुतूहल, मित्रांचा प्रभाव किंवा प्रसिद्धी मिळवण्याच्या हेतूने असे प्रकार करतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात डीपफेक व्हिडीओ, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल आणि डिजिटल दिशाभूल यांसारखी नवी आव्हानेही वाढत आहेत. त्यामुळे शाळा स्तरापासूनच सायबर नैतिकता, डिजिटल जबाबदारी आणि सायबर कायद्यांचे शिक्षण देणे अत्यावश्यक झाले आहे.

भारताने सोशल मीडिया पूर्णपणे बंद करण्याऐवजी 'सुरक्षित, नियंत्रित आणि जबाबदार वापर' हे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. कायदा, तंत्रज्ञान, शिक्षण, पालक आणि समाज या सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच मुलांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण होऊ शकते. प्रश्न सोशल मीडिया बंद करण्याचा नाही, तर पुढील पिढीचे मानसिक आणि सामाजिक आरोग्य जपत डिजिटल युगाशी सुसंगत विकास साधण्याचा आहे. हाच भारतासाठी सर्वांत योग्य आणि व्यावहारिक मार्ग ठरेल. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# 'सेंट्रल किचन'च्या विरोधात षडयंत्र

राज्याच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य घडावे, यासाठी विविध योजना राबिवल्या जातात. त्यासाठी कोट्यवधींचा निधी दरवर्षी खर्च केला जातो. याचे अनेक सकारात्मक परिणाम पाहायला मिळाले तर काही गैरप्रकारही समोर आले आहेत. या दोन्हीच्या आडून काही मंडळी बक्कळ पैसे कमवत असल्याचे आरोप सातत्याने होतात. सदर विभागाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्याच काय इतरही योजनांमध्ये भ्रष्टाचार होतो, ही ओरड सातत्याने होते. त्यामुळेच या योजनांच्या प्रारूपामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतात. पण, या विभागात कार्यरत असलेले किंवा जुळलेले झारीतले शुक्राचार्य त्यातूनही मार्ग काढून आपला उद्देश यशस्वी करत असल्याची स्थिती आहे. हा विभाग राज्यात ५०० शासकीय आश्रमशाळा, ५५६ अनुदानित आश्रमशाळा, ४९० शासकीय वसतिगृहे चालवितो. जवळपास ५.२५ लाख विद्यार्थी येथे प्रवेशित असतात. त्यासाठी चालू आर्थिक वर्षात ४८७१.६२ कोटींची तरतूद आदिवासी विकास विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात नमूद आहे. या निधीतून विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून तर निवास, भोजनासह इतर सर्व आवश्यक सुविधा पुरविल्या जातात. सोप्या भाषेत सांगायचे तर सदर विद्यार्थ्यांच्या पालकांना एक रुपयाचा देखील खर्च आपल्या पाल्यावर करावा लागत नाही. एका चांगल्या उद्देशाने राज्य शासन आदिवासी मुलांवर पैसे खर्च करीत असताना बोंबाबोंब आणि गैरप्रकार तर पाचविलाच पुजला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भोजनाच्या संदर्भात सातत्याने तक्रारी असतात. त्याची बहुतांश कारणे मानवी हस्तक्षेपाची आहे. यातून मार्ग काढण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून शासनाने अन्नपूर्णा योजनेतून सेंट्रल किचन ही व्यवस्था पहिल्यांदा २०१५ मध्ये नाशिक आणि पालघरमध्ये राबविली. हा पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) होता. या प्रकल्पाचे चांगले फायदे दिसल्याने टप्प्याटप्प्याने सेंट्रल किचन या संकल्पनेचा विस्तार वाढला. विद्यमान स्थितीत संपूर्ण राज्यात २० ठिकाणी सेंट्रल किचन आहे. त्यातील ४ किचनचे स्वरूप मोठे आहे. या प्रत्येक किचनला सुमारे ४० शाळा जोडल्या आहेत. उर्वरित १६ ठिकाणच्या किचनला सरासरी १० शाळा जोडल्या आहेत. साधारणपणे ३०० च्या आसपास आश्रमशाळामध्ये सेंट्रल किचनच्या माध्यमातून भोजन दिले जाते. इतर आश्रमशाळांमध्ये त्यांच्या स्तरावरच भोजन तयार करून विद्यार्थ्यांना देण्याची पूर्वीचीच योजना कायम आहे. राज्यात सर्वच ठिकाणी सेंट्रल किचन व्यवस्थित सुरू आहेत. मेळघाटातल्या धारणी तालुक्यातल्या ९ आश्रमशाळांसाठी १५ जुलैपासूनच सेंट्रल किचन सुरू करण्यात आले. फक्त १० दिवसांतच येथे आरडाओरड सुरू झाली. विशेष म्हणजे सर्व ९ शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी भोजन एकाच ठिकाणी तयार झाले असताना विषबाधेची बोंब फक्त एकाच टिटंबा शाळेतून झाली. याचाच अर्थ अन्नातला दोष किती आणि त्या आश्रमशाळेतल्या पिण्याच्या पाण्यासह अन्य सुविधांचा किती? याचा शोध आवश्यक झाला आहे.

सदर प्रकरण समोर आल्यानंतर प्रशासनाने गंभीर दखल घेतली. लगेच दुसऱ्या दिवशी आदिवासी विकास मंत्री पोहोचले. त्यांनी आढावा घेतल्यावर कारवाई तीव्र झाली. सदर शाळेत आलेल्या अन्नाचे, पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले आहे. त्याचा अहवाल आल्यावर नेमके कारण समोर येईलच. पण, तत्पूर्वी मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस तर अधीक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. टेमली येथील सेंट्रल किचन तात्पुरते बंद करण्यात आले आहे. आता पूर्वीप्रमाणेच ९ शाळांमध्ये सोमवारपासून भोजन बनविले जात आहे. धारणी तालुक्यात सेंट्रल किचन सुरू झाल्याने येथील अन्न न खाताच काहींना पोटदुखी सुरू झाली होती. त्यांनीच किचन बंद पाडण्याचे षडयंत्र रचले असून त्यांना स्थानिक पुरवठादारांनी बळ दिल्याचे सांगितले जात आहे. सेंट्रल किचनमुळे आश्रमशाळांना भोजनासाठी आवश्यक सर्व साहित्याचा पुरवठा बंद झाला. त्यामुळे अनेक पुरवठादारांची सर्व प्रकाराची दुकानदारी बंद झाली होती. या दुकानदारीवर अवलंबून असलेले लाभार्थी सुद्धा अस्वस्थ झाले होते. या सर्वांनी मिळूनच शासनाच्या योजनेला आव्हान दिले. जुन्या व्यवस्थेतील तक्रारींपेक्षा सेंट्रल किचनमधल्या तक्रारींचे प्रमाण निश्चितच कमी असेल. ज्या तक्रारी आहेत त्या दूर करता येतील. तशा सूचना केल्या पाहिजेत. पण, सरसकट सेंट्रल किचन बंद करण्याची मागणी म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्याय व भामट्यांसाठी मोकळे रान ठरेल. आदिवासी पालकांनी शासन व्यवस्थेच्या पाठीशी उभे राहायला हवे, ही अपेक्षा! ■

९४२०७२१२२५

## दिल्ली वार्तापत्र

# धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याचा अन्वयार्थ

**श्यामकांत जहागीरदार**

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या राजीनाम्यामुळे देशात अनेकांना हळहळ वाटली. धर्मेंद्र प्रधान मोदी सरकारमधील चौथे शिक्षण मंत्री होते. १२ वर्षांत मोदी सरकारमध्ये चार जणांनी शिक्षण मंत्री हे पद भूषवले. आता प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रिपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

१९८५ ते २०२० पर्यंत या मंत्रालयाचे नाव मानव संसाधन विकास मंत्रालय असे होते. देशात नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यानंतर या मंत्रालयाचे नाव बदलून ते शिक्षण मंत्रालय असे करण्यात आले. स्मृती इराणी, प्रकाश जावडेकर आणि रमेश पोखरियाल निशंक हे मानव संसाधन विकास मंत्री होते. त्या अर्थाने प्रधान यांना मोदी सरकारमधील पहिले शिक्षण मंत्री म्हणावे लागेल. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात डॉ. मुरलीमनोहर जोशी हे देशाचे मानव संसाधन मंत्री होते. स्मृती इराणी या मोदी सरकारमधील पहिल्या मानव संसाधन विकास मंत्री होत्या, नंतर प्रकाश जावडेकर मानव संसाधन विकास मंत्री झाले, त्यांच्यानंतर रमेश पोखरियाल निशंक यांच्याकडे या मंत्रालयाची जबाबदारी आली. विद्यार्थी चळवळीतून पुढे आलेल्या तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते असलेल्या आणि विद्यार्थी आंदोलनात आघाडीवर राहात असलेल्या धर्मेंद्र प्रधान यांना विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळेच शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला, हा काव्यात्मक न्याय म्हणावा लागेल.

विशेष म्हणजे प्रधान यांनी शिक्षण मंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. असा कार्यकाळ पूर्ण करणारे ते मोदी सरकारमधील पहिलेच शिक्षण मंत्री होते. स्मृती इराणी यांनी दोन वर्षे, प्रकाश जावडेकर यांनी तीन वर्षे तर पोखरियाल यांनी दोन वर्षे या मंत्रालयांची जबाबदारी सांभाळली.

देशातील नवीन शैक्षणिक धोरणाचे शिल्पकार आणि सूत्रधार म्हणून धर्मेंद्र प्रधान यांचे नाव घ्यावे लागेल. नव्या शैक्षणिक धोरणाला मूर्त रूप देण्यात आणि त्यांची अंमलबजावणी घडवून आणण्यात शिक्षण मंत्री म्हणून प्रधान यांची मोठी भूमिका होती. योगायोग म्हणजे पेपरफूट प्रकरणाची नैतिक जबाबदारी घेत धर्मेंद्र प्रधान यांनी यावेळी राजीनामा दिला असला तरी याच मुद्यावर त्यांनी विद्यार्थी नेते असताना आंदोलनही केले होते. १९९७ ची घटना आहे. प्रधान त्यावेळी अभाविपचे राष्ट्रीय मंत्री होते. पेपरफुटीच्या घटनेच्या विरोधात प्रधान यांनी ओडिशात मंत्रालयासमोर निदर्शने केलीत. शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. यात प्रधान गंभीर जखमी झाले होते. मात्र आता तशाच आंदोलनाने त्यांना पायउतार व्हावे लागले. जवळपास चार दशकांपासून राजकारणात सक्रिय असलेले धर्मेंद्र प्रधान यांची कौटुंबिक पृष्ठभूमी राजकीय आहे. त्यांचे वडील देवेंद्र प्रधान जनसंघ आणि भाजपाचे नेते होते. देवेंद्र प्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळातही होते. शिक्षणमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळण्याआधी प्रधान यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, कौशल्य विकास तसेच पोलाद मंत्रालयांचीही जबाबदारी सांभाळली.

२००० मध्ये ओडिशाच्या पल्लाहारा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक जिंकत धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला. २००४ ची लोकसभा निवडणूक प्रधान यांनी ओडिशाच्या देवगड मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. देवगड हा त्याच्या वडिलांचा- देवेंद्र प्रधान यांचा- मतदारसंघ होता. मात्र २००९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, २०१० मध्ये भाजपाने त्यांना राष्ट्रीय महासचिव बनवले. २०१२ मध्ये प्रधान यांना भाजपाने बिहारमधून राज्यसभेवर पाठवले. दोन कार्यकाळ राज्यसभेत राहिल्यानंतर २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी ओडिशाच्या संबलपूर मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. २००९ नंतर म्हणजे तब्बल १५ वर्षांनंतर ते लोकसभेत परतले.

मौलाना अबुल कलाम आझाद हे देशातील पहिले शिक्षण मंत्री होते. सर्वाधिक म्हणजे ११ वर्षे या मंत्रालयाची जबाबदारी अबुल कलाम आझाद यांनी सांभाळली. त्यांच्या खालोखाल डॉ. मुरलीमनोहर जोशी सहा वर्षे मानव संसाधन विकास मंत्री होते. प्रधान यांच्याआधी डॉ. के. एल. श्रीमाळी, प्रो. एस. नुरुल हसन, अर्जुनसिंह यांनी या पदावर पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. नंतर पंतप्रधान झालेले विश्वनाथ प्रतापसिंह आणि पी. व्ही. नरसिंहराव यांनीही शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी सांभाळली होती.

आधी शिक्षण मंत्री असलेले फखुद्दिन अली अहमद नंतर देशाचे राष्ट्रपतीही झाले होते. अर्जुनसिंह आणि नरसिंहराव यांच्याकडे एकदा नाही तर दोनदा या खात्याची जबाबदारी आली. महाराष्ट्राचे शंकरराव चव्हाण यांनीही देशाचे शिक्षण मंत्री म्हणून काम केले. कोणत्याही कारणाने राजीनामा द्यावा लागणारे धर्मेंद्र प्रधान हे मोदी सरकारमधील दुसरे मंत्री ठरले आहेत. २०१८ मध्ये मी टू आंदोलनादरम्यान लैंगिक शोषणाचा आरोप झाल्यामुळे तेव्हा परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री असलेले एम. जे. अकबर यांना राजीनामा द्यावा लागला होता.

शिक्षण मंत्रिपदावर असताना राजीनामा द्यावा लागलेले धर्मेंद्र प्रधान हे दुसरे मंत्री आहेत १९६७ मध्ये इंदिरा गांधी यांच्याशी व्यक्तिगत आणि राजकीय मुद्यांवरून मतभेद झाल्यामुळे तेव्हाचे शिक्षण मंत्री मोहम्मद करीम छागला यांनी राजीनामा दिला होता.

शिक्षणमंत्र्याने कोणत्याही राजकीय कारणामुळे अडचणीत येण्याची ही पहिली वेळ नाही. छागलानंतर त्रिगुण सेन हे शिक्षण मंत्री झाले. क्षेत्रीय भाषा विवादामुळे ते अडचणीत आले होते. विश्वनाथ प्रतापसिंह यांना मंडल आयोग आणि आरक्षण धोरणाचा फटका बसला होता. डॉ. मुरलीमनोहर जोशी यांच्यावर एनसीईआरटीच्या भगवेकरणाचा आरोप झाला होता. अर्जुनसिंह यांच्यावर ओबीसी आरक्षणाला विरोध केल्याचा आरोप होता. कपिल सिब्बल यांना चार वर्षीय स्नातक अभ्यासक्रमाने अडचणीत आणले होते. स्मृती इराणी यांच्या काळातही रोहित वेमुला, जेएनयू आणि अलाहाबाद विद्यापीठातील काही घटनांनी वादळ निर्माण केले होते. रमेश पोखरियाल निशंक यांना नव्या शैक्षणिक धोरणाच्या मुद्यावरून घेरले होते.

### नैतिक जबाबदारी घेत राजीनामा देणारे तीन मंत्री

पदावर असताना आतापर्यंत १० केंद्रीय मंत्र्यांना विविध कारणांवरून राजीनामा द्यावा लागला. नैतिक मुद्यावरून राजीनामा देणारे देशात आतापर्यंत तीन मंत्री झाले. यात लालबहादूर शास्त्री, नितीशकुमार आणि धर्मेंद्र प्रधान यांचा समावेश आहे. लालबहादूर शास्त्री आणि नितीशकुमार यांनी रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेत राजीनामा दिला होता.

'नीट' परीक्षेतील गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी घेत ओडिशाचे लाल असलेल्या बहादूर धर्मेंद्र प्रधान यांनी आता राजीनामा दिला आहे. उर्वरित ७ मंत्र्यांना भ्रष्टाचाराच्या वा गैरवर्तनाच्या आरोपावरून राजीनामा द्यावा लागला होता. त्यामुळेच प्रधान यांच्या राजीनाम्याने सर्वसामान्य माणूस हळहळला आहे. ■

९८८१७१७८१७

### आदरणीय जोशी सर : पत्रकारितेतील दीपस्तंभ



पत्रकारितेच्या क्षेत्रात ज्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण, सकारात्मक आणि गुरुतुल्य वृत्तीने पत्रकारांच्या अनेक पिढ्या घडविल्या ते आदरणीय जोशी सर काळाच्या पडद्याआड गेले आहेत. 'जळगाव तरुण भारत'ला ज्या ज्येष्ठ - श्रेष्ठ संपादकांची उल्लेखनीय परंपरा लाभली आहे, त्यात ल. त्र्यं. जोशी सर अग्रणी होते. राज्य आणि देश पातळीवरील राजकारण आणि समाजकारणाबरोबरच विविध राजकीय पक्षांतील नेत्यांच्या वृत्ती आणि स्वभावाचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात प्रभावीपणे उमटायचे. त्यामुळे सरांचे लेखन अभ्यासपूर्ण, वाचनीय आणि मार्गदर्शक वाटायचे.

मी 'जळगाव तरुण भारत'मध्ये कार्यरत असताना जोशी सरांनी या आवृत्तीसाठी घेतलेले कष्ट आणि घालून दिलेले आदर्श हेच माझ्यासाठी मार्गदर्शक होते. सरांनी या आवृत्तीला नावारूपाला आणण्यासाठी किती आणि कसे प्रयोग केले त्याबद्दल सर्व ज्येष्ठ सहकारी आणि वरिष्ठांकडून मला कळले होते. विशेषतः डॉ. भरत अमळकर, रत्नाकर पाटील, संजय बिर्ला, दिलीप चोपडा, रवी लढ्ढा यांच्यासोबतच अन्य प्रकल्पातील सहकाऱ्यांनीसुद्धा जोशी सरांचा स्वभाव आणि त्यांची कर्तव्यनिष्ठा याबद्दल वेळोवेळी जे सांगितले होते, त्यातूनच सरांचे एक आदरयुक्त व्यक्तिमत्त्व माझ्या मनात निर्माण झाले होते. माझा सरांशी प्रत्यक्ष संपर्क आला तो त्यांच्या 'सारांश' या सदराच्या निमित्ताने. त्यावेळी त्यांच्याशी बोलताना एक जाणवले की, ''समाजावर आईसारखे निःस्वार्थ प्रेम करूया'' या ध्येयाने समाजात विविधांगी सेवाकार्ये उभे करणारे स्व. श्रद्धेय डॉ. आचार्य दादांबद्दल सरांना किती नितांत आदर आहे. ते त्यांच्या प्रत्येक शब्दातून आणि प्रत्येकवेळी जाणवायचे. आपली आवृत्ती अधिक समृद्ध करण्यासाठी दिवाळी अंक, विशेषांक आणि नैमित्तिक अंकांची जी परंपरा सरांनी घालून दिली आहे ती आजतागायत सुरू आहे. आर्थिकदृष्ट्या लाभासाठी कुठलीही अयोग्य आणि अमान्य तडजोड करायची नाही हा त्यांचा दंडक सर्वांसाठीच आदर्शभूत आणि अनुकरणीय आहे. सरांसोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी जरी मला मिळाली नसली तरी 'तरुण भारत'मधील एक सहकारी म्हणून अन्य सहकाऱ्यांप्रमाणेच मलाही सरांचा स्नेह आणि आशीर्वाद लाभला आहे. तरुण भारतमधील प्रत्येक घटक सर्वार्थाने समृद्ध व्हावा या त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी सारेच प्रयत्नशील राहूया. हीच आदरणीय जोशी सरांना खरी आदरांजली ठरेल!

**दिनेश दगडकर**/९९२२९११९४४६

(माजी निवासी संपादक, तरुण भारत, जळगाव)

■■■

## वाचक पत्रे

### अभिजित मुहूर्त नसतो सदाकदा

कॉक्रोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी जंतर मंतर येथील आंदोलनानंतर केंद्र सरकारने शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेतला असा दावा केला. आता आंदोलकांवरील सर्व खटले सरसकट मागे न घेतल्यास पुन्हा मोठे आंदोलन छेडू, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र, एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की प्रत्येक आंदोलनात दरवेळी विजय मिळतोच असे नाही. त्यामुळे भावनिक आवेशापेक्षा संयम, विचारपूर्वक निर्णय आणि वक्तव्यातील प्रगल्भता अत्यंत आवश्यक असते. 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी विरोधात कॉक्रोच जनता पक्षातर्फे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. आंदोलनाच्या दबावामुळेच हा राजीनामा झाला असा दावा केला जात असला, तरी यामागील राजकीय पृष्ठभूमी वेगळी होती.



एका मोठ्या वर्गाने याआधीच 'यूजीसीच्या नियमावलीतील बदलांवरून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन उभारले होते. पुढे सर्वोच्च न्यायालयाने या बदलांना स्थगिती दिल्याने तो विषय तिथेच थांबला. परंतु, वाढत्या नाराजीमुळे सरकारला प्रधान यांचा राजीनामा घेणे अनिवार्य झाले असावे. त्यामुळे हा राजीनामा केवळ एकाच आंदोलनाचा परिणाम होता, असे मानणे वास्तवाला धरून ठरणार नाही.

पंजाब, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये झालेल्या पेपरफुटीबाबत तेथील शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागणार का, असा थेट प्रश्न विचारल्यावर दीपके यांचे उत्तर अत्यंत गोलमोल आणि पळपुटे होते; कारण तेथे विरोधी पक्षांची (आम आदमी पक्ष व काँग्रेस) सरकारे आहेत. अशी राजकीय सोयीनुसार उत्तरे देणे नेतृत्वातील अपरिपक्वता उघडी पाडणारे ठरते. आंदोलनाला कोणत्याही राजकीय दावणीला न बांधता संयम, निष्पक्षता आणि वैचारिक परिपक्वता दाखवली, तरच त्याला खरी नैतिक ताकद, प्रतिष्ठा आणि जनपाठिंबा मिळू शकतो. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राज्यस्तरीय वधू - वर परिचय मेळाव्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३० जुलै : येत्या २ ऑगस्ट रोजी डोंगरदिवे वधू - वर सूचक मंडळा तर्फे लातूरच्या पत्रकार भवन, शिवाजी चौक येथे वधू - वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे .

या संधी चा फायदा पालकांनी, इच्छूक वधू वर , त्यांच्या नातेवाईकांनी तसेच मित्र - मैत्रीण यांनी घ्यावा आणि आपला जोडीदार निवडावा परिचय मेळावा असल्यामुळे नियोजित वधू - वर तसेच त्यांचे आई -वडील आणि नातलग यांना समोरासमोर भेटता येते, चर्चा करता येते, आवडी - निवडीवर खुलेपणाने चर्चा केली जाऊ शकते आणि आपला तसेच समोरच्या व्यक्तीच्या स्वभावाचे अनुभव विना मोबदला मिळतात .

आपल्या होणाऱ्या जोडीदारांचे स्वभाव, त्यांच्या आवडी - निवडीवर खुलेपणाने चर्चा केली जाऊ शकते

त्यामुळे या संधीचा इच्छूकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डोंगरदिवे वधू - वर सूचक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कांतीलाल डोंगरदिवे यांनी केले आहे



# विविध वृत्त.....

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १९.३ मिलीमीटर पावसाची नोंद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० जुलै : जिल्ह्यात ३० जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी १९.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये उदगीर तालुक्यात सर्वाधिक ३८.३ मिलीमीटर, तर औसा तालुक्यात सर्वात कमी ५.५ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी (मिलीमीटरमध्ये) पुढीलप्रमाणे आहे: लातूर - १४.१, औसा - ५.५, अहमदपूर - २०.१, निलंगा - ८.९, उदगीर - ३८.३, चाकूर - २४.३, रेणापूर - २३.४, देवणी - २८.९, शिरूर अनंतपाळ - २३.१ आणि जळकोट - २५.८ मिलीमीटर.

## लातूरच्या ५ शेतकऱ्यांना मिळणार परदेशात अभ्यास दौऱ्याची संधी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० जुलै : राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशांमधील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती व्हावी, तसेच शेतमालाची निर्यात, कृषी मालाचे पणन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी आणि कृषीमाल प्रक्रिया यांबाबत अद्ययावत ज्ञान अवगत करता यावे यासाठी कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे योजना सन २०२६-२७ राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत परदेशातील शेती तंत्रज्ञान समजून घेऊन त्याचा वापर राज्यातील शेतकरी स्वतःच्या शेतीमध्ये करू शकतील, तसेच संबंधित देशांतील शेतकऱ्यांशी थेट चर्चा, क्षेत्रीय भेटी व विविध कृषी संस्थांना भेटी देऊन शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार चालू वर्षात युरोप आणि चीन या देशांची निवड करण्यात आली असून लातूर जिल्ह्यासाठी एकूण ५ शेतकऱ्यांचे भौतिक लक्षांक प्राप्त झाले आहे. प्राप्त लक्षांकानुसार १ महिला शेतकरी, १ केंद्र किंवा राज्यस्तरीय विविध कृषी पुरस्कार प्राप्त अथवा पीक स्पर्धा विजेते शेतकरी आणि ३ इतर शेतकरी अशा वर्गवारीतून निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी शासनाकडून एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त २ लाख रुपये (यांपैकी जी रक्कम कमी असेल ती) अनुदान दिले जाणार आहे. या दौऱ्यासाठी पात्र शेतकऱ्यांची निवड जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाणार असून, लातूर जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी येत्या १० ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

## लातूर येथे 'मेरा रेशम, मेरा अभिमान-२' अंतर्गत पहिली रेशीम भागधारकांची सल्लामसलत बैठक उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० जुलै : जिल्हा रेशीम कार्यालय येथे केंद्रीय रेशीम बोर्ड अंतर्गत 'मेरा रेशम, मेरा अभिमान - २' या उपक्रमाची पहिली रेशीम भागधारकांची सल्लामसलत बैठक मंगळवारी झाली. या बैठकीसाठी केंद्रीय रेशीम बोर्डाचे शास्त्रज्ञ डॉ. बाबुलाल सायनी यांनी तुती लागवड व कीटक संगोपन करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. तसेच त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन करून शंकांचे निरसन केले.

यावेळी जिल्हा रेशीम विकास अधिकारी गोविंद कदम यांनी सांगितले की, शेतीला जोडधंदा म्हणून 'सिल्क व मिल्क' (रेशीम आणि दुग्ध व्यवसाय) केल्यास प्रति एकरी उत्पादनात मोठी वाढ होते. या संकल्पनेचे वैशिष्ट्य म्हणजे दुग्ध व्यवसायासाठी वेगळे चारा पीक घेण्याची गरज भासत नाही. रेशीम कीटकांनी खाऊन उरलेला तुतीचा पाला हा प्रथिनांचा भरपूर मोठा स्त्रोत आहे. हा पाला जनावरांना खाऊ घातल्यास दुधाचे प्रमाण वाढते, दुधाचे फॅट चांगले बसते आणि जनावरांची तब्येतही उत्तम राहते, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीस जिल्हा रेशीम कार्यालयातील तांत्रिक अधिकारी सुरनर, तांत्रिक सहाय्यक पवार, देशमुख, कदम, वाघमारे, डोंगरे यांच्यासह जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी व चॉकीधारक शेतकरी आकाश जाधव आणि शत्रुघ्न फड हे उपस्थित होते.

# पत्रकारांनी एकसंघ राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका घ्यावी : आ. कराड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जुलै : इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या आजच्या काळात प्रिंट मीडियाने विश्र्वासहर्ता जपणे गरजेचे असून रेणापूर तालुक्यातील सर्व पत्रकारांनी एकसंघ राहून ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम करून रेणापूर तालुक्याच्या विकासात योगदान द्यावे असे अवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या रेणापूर तालुका कार्यालयाचे उद्घाटन आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे हे होते तर याप्रसंगी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अरविंद सावंत, भाजपाचे नेते विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूरच्या नगराध्यक्ष शोभाताई आकनगिरे, संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर, पंस उपसभापती शरद दरेकर, बळीराजा पाणंद शेत रस्ता समिती सदस्य अनिल भिसे, पंस सदस्य तात्याराव वाघमारे, श्रीदेवी गालफाडे, शिवसेनेचे सचिन दाने, राष्ट्रवादीचे बालाजी कदम, नपचे मुख्याधिकारी अजित डोके, पंस अति. गटविकास अधिकारी गोविंद काळे, नायब तहसीलदार यादव, पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर फुले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

त्रकारांनी समाजासमोर वास्तव मांडले पाहिजे. पत्रकाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असून कोणीही नाव ठेवणार नाही अशी पत्रकारांकडून कृती घडू नये अशी मौलिक सूचना करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुक्याचे आणि माझे अतूट नाते असून या तालुक्यातील सर्व पत्रकारासाठी गृहनिर्माण संस्था सुरू करावी त्यास लागणारी सर्वतोपरी मदत करू अशी ग्वाही देऊन पत्रकारांच्या कामकाजासाठी माझ्याकडून संगणक दिले जाईल असे बोलून दाखवले.

या कार्यक्रमात अशोक देडे, अरविंद सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त करून पत्रकारांच्या भावना व्यक्त केल्या. प्रस्तावित शरद राठोड यांनी केले तर शेवटी विष्णू आचार्य यांनी आभार मानले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी सदस्य तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## शेतकरी सन्मान योजना : पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांना १३,६०० कोटींची कर्जमाफी

तभा वृत्तसेवा

लातूर, दिनांक ३० जुलै : राज्य शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान योजने'ची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. २५ जुलै रोजी या योजनेची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील तब्बल १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. याद्वारे त्यांना १३,६०० कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाणार आहे, अशी माहिती राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिली.

योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत माहिती देताना सहकार आयुक्त तावरे म्हणाले, शासनाने महाआयटीच्या (चरहरखढ) माध्यमातून एका विशेष पोर्टलची निर्मिती केली आहे. कर्जमाफी, एकवेळ तडजोड आणि प्रोत्साहन अशा तीन महत्त्वपूर्ण घटकांवर आधारित या योजनेची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक ठेवण्यात आली आहे.

ज्या शेतकरी बांधवांची नावे या पहिल्या यादीत समाविष्ट आहेत, त्यांनी त्वरित आपल्या जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रात' (उडउ) जाऊन स्वतःचे आधार कार्ड किंवा यादीतील विशिष्ट क्रमांक देऊन आधार प्रमाणीकरण (-रवहररी -गींहशपींळलरींळेप) पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रमाणीकरण यशस्वी होताच लाभाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाईल. या प्रक्रियेसाठी 'ग्रीस्टॅक' (-सीळडींरलज्ञ) फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांकडे हा आयडी नाही, त्यांना सेवा केंद्रावरच तो तत्काळ काढून दिला जाईल.

व्यावसायिक बँकांमधील (ऊाशीलळरश्र इरपज्ञी) थकीत कर्जाबाबत (छझ- खाती) शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असू नये, यासाठी सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले की, ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची रक्कम पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तारखेनंतरच्या व्याजाचा भार संबंधित बँकांनी उचलण्याची जबाबदारी घेतली असल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ होणार आहे.

## श्री केशवराज विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जून : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या प्रत्येक वर्गात 'गुरुपौर्णिमा' उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे,पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीमती सुनिता बनसोडे, संस्कार मंडळ प्रमुख श्रीमती रंजना साकोळे, कार्यक्रम प्रमुख श्रीमती जान्हवी देशमुख तसेच पालक प्रतिनिधी बांगड व सौ.सुप्रिया शिंदे यांची मंचावर उपस्थिती होती.

मंचावरील प्रतिमा पूजनानंतर आठवी ते दहावी विभागात वर्गशः गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्गशः कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यक्रमाची तयारी, वर्गाची सजावट याबाबतीत विद्यार्थ्यांचा उत्साह अवर्णनीय होता. या कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनीच केले होते.सर्व वर्गांमध्ये त्या त्या वर्गाचे वर्गशिक्षक हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते,तर प्रत्येक वर्गातील एक पालक या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थी मनोगतातून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदराच्या भावना व्यक्त केल्या. तसेच सर्वच वर्गातील प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांनी गुरुप्रती आदरभाव बाळगावा, गुरुबद्दल नेहमी कृतज्ञतेची भावना मनात बाळगावी असे मत व्यक्त केले. शाळेतील संस्कार मंडळाच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला.

## थकबाकीदारांवर आता मनपाची जप्ती मोहीम




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० जुले : लातूर महानगर पालिकेने मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आता कंबर कसली असून शहरात१४९० बड्या मालमत्ता धारकांकडे प्रत्येकी१ लाख रुपयांपेक्षा अधिक कर थकीत असून मनपा तर्फे झोन निहाय विशेष पथके तैनात केली जाणार आहेत .

शहराचे रस्ते, गटारी, पाणी, पथदिवे आणि स्वच्छते सारखी कामे करण्यासाठी मालमत्ता करावरच अवलंबून रहावे लागते . तसेच मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारी ही यातूनच होत असतात .

बड्या थकबाकीदारांच्या टाळाटाळीमुळे विकास कामांना खीळ बसत असून याचा नाहक फटका नियमित कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांना बसत आहे . मनपा प्रशासनाने गेत्या दिड वर्षात ७ वेळा दंड माफी योजना राबविली आहे .२३ जुलै पर्यत६५०० सामान्य नागरिकांनी याचा लाभ घेतला . मात्र बड्या थकबाकी धारकांनी या योजनेकडे पाठ फिरविली आहे .

त्यामुळे आता१ ऑगस्ट पासून१४९० बड्या थकबाकीदारांवर धडक कारवाई केली जाणार आहे . कर न भरल्यास थेट नळजोडणी तोडणे, मालमत्ता सील करणे आणि शेवटी जप्तीची कारवाई केली जाणार असत्यामुळे थकबाकीदारांनी वेळेत थकबाकी भरून आपली होणारी जप्ती टाळावी, असे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

## प्राणी क्लेश प्रतिबंधक सदस्यांची नेमणुकीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० जुलै : जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीच्या व्यवस्थापकीय समितीवर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक अर्जदारांसाठी अर्जाचा नमुना संबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध असून या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणाऱ्या प्रमाणपत्रासह विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

या व्यवस्थापकीय समितीवर शासनामार्फत विविध अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील गोशाळा किंवा पांजरपोळ संस्थांपैकी एका संस्थेचे अध्यक्ष, प्राणी कल्याणविषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांचे दोन सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशन केलेल्या दोन व्यक्ती, तसेच जिल्ह्यात मानवहितकारक व प्राणी कल्याणासाठी कार्यरत असणारे पाच ते सहा कार्यकर्ते यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे प्राणी कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या पात्र संस्था, कार्यकर्ते आणि इच्छुकांनी ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी केले आहे.

# २ लाख २३ हजार ६६४ विद्यार्थ्यांशी पोलीस साधणार थेट संवाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० जुलै : विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच त्यांच्यामध्ये कायद्याविषयी जागरूकता, जबाबदारीची भावना आणि सामाजिक भान निर्माण करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘विद्यार्थी संवाद’ या अभिनव उपक्रमाचा दुसरा टप्पा दि. १ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होत आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत असून, आगामी दोन महिन्यांच्या कालावधीत पोलीस अधिकारी विद्यार्थ्यांच्या शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.

‘पोलीस विद्यार्थी संवाद’ उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात लातूर जिल्ह्यातील ३६२ शाळा, १०० महाविद्यालये व ४६ कोचिंग क्लासेसमधील १ लाख १७ हजार २१२ विद्यार्थ्यांशी पोलिसांनी प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी कायदे, सायबर सुरक्षा, सोशल मीडिया, वाहतूक नियम, महिला व बालकांची सुरक्षितता आणि व्यसनमुक्ती आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यातील पोलीस विद्यार्थी संवाद या उपक्रमाबाबत शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक तसेच सर्व मुले आणि मुली यांनी खूप समाधान व्यक्त केले तसेच पोलीस विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाविषयी सविस्तर माहिती प्राप्त झाली कायद्याची ओळख झाली व पोलीस विभागाबाबत एक सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त झाला. त्याचबरोबर कायद्याचे पालन करणे व कायद्याबद्दल माहिती असणे किती आवश्यक आहे अशा प्रतिक्रिया प्राप्त झाल्या होत्या एकंदर पोलीस विद्यार्थी संवाद हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी खूपच उपयुक्त असल्याची एकंदर प्रतिक्रिया व समाधान व्यक्त झाल्याचे दिसून आले होते.

दुसऱ्या टप्प्यात २ लाख २३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार ‘पोलीस विद्यार्थी संवाद’. या उपक्रमात लातूर जिल्ह्यातील एकूण २३ पोलीस ठाण्यांचा सहभाग राहणार आहे. जिल्ह्यातील माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी पोलीस अधिकारी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत.

या उपक्रमांतर्गत ५५८ शाळांमधील १,४०,४३६ विद्यार्थी, ९१ महाविद्यालयांमधील ५९,६७५ विद्यार्थी व ४८ कोचिंग क्लासेसमधील २३,५५३ विद्यार्थी अशा एकूण २,२३,६६४ विद्यार्थ्यांपर्यंत लातूर पोलीस दल पोहोचणार आहे.

विशेष म्हणजे, केवळ व्याख्यानापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष प्रश्र्नोत्तर, मुक्त संवाद आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून त्यांच्या अडचणी, शंका आणि समस्या समजून घेण्यावरही भर देण्यात येणार आहे. दहा महत्त्वपूर्ण विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित तसेच भविष्यात अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या विविध विषयांवर पोलीस अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यार्थ्यांनी अमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा, सिगारेट, ई-सिगारेट तसेच अन्य व्यसनांपासून दूर राहावे, याबाबत पोलीस अधिकारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. व्यसनामुळे होणारे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम, शिक्षण व करिअरवर होणारा विपरीत परिणाम, व्यसनाधीनतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा तसेच मित्र-मैत्रिणींमध्ये व्यसनाची सुरुवात होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. ‘नशामुक्त युवा, सुरक्षित भविष्य’ या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या मनातील पोलिसांबाबतची भीती कमी करून ‘पोलीस आपले मित्र आहेत’ हा विश्र्वास दृढ करण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती केवळ पुस्तकातून न देता, त्यांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे समजावून सांगण्यात येणार आहे.आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक, अधिकारी, उद्योजक आणि समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कायद्याचे ज्ञान, डिजिटल सुरक्षिततेची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची शिकवण देणे ही काळाची गरज आहे.कायद्याची माहिती असलेला विद्यार्थी स्वतः सुरक्षित राहतो आणि इतरांनाही सुरक्षित ठेवतो, या भावनेतून लातूर पोलीस दलाचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेला ‘पोलीस-विद्यार्थी संवाद’ हा उपक्रम म्हणजे पोलिसिंगच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन पोलीस आणि समाज, विशेषतः युवा पिढी यांच्यातील विश्र्वासाचे नाते अधिक दृढ करणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

## राष्ट्रनिर्मितीमध्ये गुरू-शिष्याचे योगदान मोलाचे : प्रा.डॉ. सोलापूरे

तभा वृत्तसेवा




लातूर दि.३० जुलै : गुरू म्हणजे केवळ शिक्षण देणारी व्यक्ती नव्हे तर अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा दीपस्तंभ आहे. आई-वडील आपल्याला जन्म देतात. परंतु गुरू आपल्याला जीवन जगण्याची कला शिकवतात, व्यक्तिमत्त्व घडवतात, संस्कार रूजवतात आणि यशस्वी जीवनाचा मार्ग दाखवतात. आज विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये माहिती सहज उपलब्ध होते. महर्षी व्यास यांच्या स्मरणार्थ साजरी होणारी गुरू पोर्णिमा या माध्यमातून योग्य ज्ञान, विवेक आणि मुल्यांची शिकवण देणारा गुरू ही तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी गुरूकडून केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रामाणिकपणा, शिस्त, परीश्रम, संवेदनशिलता आणि समाजसेवेचे संस्कार आत्मसात केले पाहिजेत. त्यामुळे खर्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीमध्येच गुरू-शिष्यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन प्रसिध्द व्याख्याते प्रा.डॉ.राजशेखर सोलापूरे यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम शिक्षण संस्था लातूर व भारतीय जनता पार्टी लातूर शहर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूपोर्णिमेनिमित्त गुरू विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शिल्पकार या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.शेषराव मोहिते, ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक विष्णू चाकूरकर, लातूर ईस्कॉन सेंटरचे अध्यक्ष युगल प्रेमदास बाहेती, आर्ट ऑफ लिव्हिंगचे कैलास पाटील,समन्वयक अनिरूध्द पाटील, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य संदिप पांचाळ, प्राचार्य निलेश पौळ, प्राचार्य विकास लबडे, समन्वयक शैलेश कचरे, प्राचार्य गिरी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ.राजशेखर सोलापूरे म्हणाले की, गुरू पोर्णिमा ही गुरू-शिष्याचे नाते वृंध्दीगत करणारा दिवस आहे. त्यामुळे या पवित्र प्रसंगी आपण सर्वांनी आपल्या जीवनातील गुरूजनापैकी कृतज्ञता व्यक्त करूया. त्यांच्या मार्गदर्शनाचा आदर करूया आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणाचा संपकल्प यशस्वीपणे साकार करूया. असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

दखल

# तस्लिमा नसरीन आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

**निर्वासित बांगलादेशी लेखिका डॉ. तस्लिमा नसरीन दि. 1 ऑगस्ट रोजी रवींद्र सदनात कट्टरतावाद विरोधी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी कोलकाता येथे येणार आहेत. त्यांच्या पुनरागमनाने भाषणस्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, जिहादी कट्टरवाद्यांचे आव्हान व त्यांच्या प्रदीर्घ वनवासाला कारणीभूत ठरलेल्या घटकांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.**

बांगलादेशातून हद्दपार झालेल्या लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या तस्लिमा नसरीन १ ऑगस्ट रोजी कोलकात्यात येणार आहेत. त्या 'रवींद्र सदन' येथे आयोजित एका 'मूलतत्त्ववाद-विरोधी' कार्यक्रमाला उपस्थित राहणार असून, गेल्या दोन दशकांतील त्यांची या शहरातील ही पहिलीच मोठी सार्वजनिक भेट ठरणार आहे.

तीन संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात कविता वाचन, चर्चासत्रे आणि लेखिकेचा नागरी सत्कार यांचा समावेश असेल. डॉ. तस्लिमा नसरीन यांच्या या भेटीमुळे पश्चिम बंगालमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले आहे; तसेच विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, जिहादी कट्टरवाद, साहित्यिक सेन्सॉरशिप आणि लेखिकेला बांगलादेश व कोलकाता सोडावे लागण्यामागची परिस्थिती या मुद्यांवर पुन्हा एकदा वादविवाद-चर्चा सुरू झाली आहे.

**धर्मांधांना आव्हान देणाऱ्या लेखिका**

१९६२ मध्ये बांगलादेशातील मयमनसिंह येथे जन्मलेल्या तस्लिमा नसरीन यांनी लेखिका, स्तंभलेखिका आणि कार्यकर्त्या म्हणून ओळख निर्माण करण्यापूर्वी वैद्यकीय शिक्षण घेतले होते. कालांतराने महिलांचे अधिकार, धर्मनिरपेक्षता, धार्मिक कर्मठपणा आणि अल्पसंख्यकांचे हक्क याबाबतच्या स्पष्ट आणि रोखठोक मतांमुळे त्या ओळखल्या जाऊ लागल्या.

१९९३ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'लज्जा' (शेम) या कादंबरीमुळे त्या आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आल्या. भारतात बाबरी ढांचा विध्वंसानंतर बांगलादेशातील एका हिंदू कुटुंबाने अनुभवलेल्या परिस्थितीचे चित्रण या कादंबरीत करण्यात आले होते; तसेच धार्मिक अल्पसंख्यकांना सहन करावी लागणारा हिंसाचार आणि भेदभाव यांबाबतच्या चिंताही यात मांडल्या होत्या.

या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे बांगलादेशात मोठा वाद निर्माण झाला. इस्लामी समूहांनी लेखिकेविरुद्ध निदर्शने केली, तर अनेक धार्मिक संघटनांनी त्यांच्यावर इस्लामचा अपमान केल्याचा आरोप केला. त्यांच्या विरोधात फतवे जारी करण्यात आले आणि कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली. नंतर बांगलादेश सरकारने या पुस्तकावर बंदी घातली आणि सुरक्षेच्या वाढत्या चिंतेमुळे नसरीन यांना अखेरीस देश सोडावा लागला.

**निर्वासित जीवन आणि वादविवाद**

बांगलादेश सोडल्यानंतर नसरीन यांनी स्वीडन, फ्रान्स, अमेरिका आणि भारत यांसारख्या अनेक देशांमध्ये वास्तव्य केले. २००४ मध्ये कोलकाता येथे स्थायिक झाल्यानंतर हे शहर त्यांच्यासाठी एक महत्त्वाचे केंद्र बनले.

मात्र, पश्चिम बंगालमधील त्यांचा मुक्कामही वादग्रस्त ठरला. त्यांच्या 'द्विखंडितो' (डिव्हायडेड) या आत्मचरित्रात्मक पुस्तकाला विविध गटांकडून विरोध झाला, ज्यामुळे ठिकठिकाणी निदर्शने झाली आणि कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या. अखेरीस, पश्चिम बंगालमधील तत्कालीन वामपंथी आघाडीच्या सरकारने या पुस्तकावर बंदी घातली.

२००७ मध्ये त्यांच्या कोलकाता येथील उपस्थिती-वरून आणि लेखनावरून शहरात हिंसक निदर्शने



झाल्याने तणाव वाढला. सुरक्षेबाबतच्या वाढत्या चिंता आणि राजकीय दबावामुळे डॉ. तस्लिमा नसरीन यांना शहराबाहेर हलवण्यात आले. त्यानंतर त्यांनी सरकारी संरक्षणाखाली दिल्लीत काही काळ व्यतीत केला.

२००७ मध्ये हैदराबादमधील एका सार्वजनिक कार्यक्रमादरम्यान काही कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला; या कार्यकर्त्यांचा आरोप होता की डॉ. डॉ. तस्लिमा नसरीन यांनी इस्लामच्या विरोधात विधाने केली होती. तेव्हापासून त्या विविध स्तरांवरील सुरक्षेत राहत आहेत आणि त्याच वेळी धर्मनिरपेक्षता, महिलांचे अधिकार व धार्मिक कट्टरता यांसारख्या मुद्यांवर सक्रियपणे आपली परखड मते मांडत आहेत.

**राजकीय क्षेत्रात प्रतिक्रिया**

डॉ. नसरीन यांच्या आगामी भेटीमुळे पश्चिम बंगालमध्ये राजकीय प्रतिक्रिया उमटल्या आहेत. राज्यातील सत्ताधारी भाजपाशी संबंधित नेत्यांनी कट्टरतावादविरोधी कार्यक्रमातील त्यांच्या सहभागाचे स्वागत केले आहे आणि डॉ. नसरीन यांचा आगामी कार्यक्रम म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य व मुक्त चर्चेला चालना देण्याची संधी असल्याचे म्हटले आहे. आयोजकांच्या मते धार्मिक कट्टरतेमुळे निर्माण होणार्या आव्हानांवर चर्चा करणे आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

दुसरीकडे काही विरोधी नेत्यांनी आणि राजकीय गटांनी या कार्यक्रमाची वेळ आणि उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, बंगालमधील ध्रुवीकरण झालेल्या वातावरणात अशा कार्यक्रमांमुळे राजकीय तणाव निर्माण होऊ शकतो. या भिन्न प्रतिक्रिया नसरीन यांचे कार्य आणि सार्वजनिक जीवन याभोवती दीर्घकाळापासून सुरू असलेल्या व्यापक चर्चेचे प्रतिबिंब दर्शवतात.

**या भेटीचे महत्त्व**

नसरीन यांचे कोलकाता येथील पुनरागमन हे केवळ एका साहित्यिक कार्यक्रमापुरते मर्यादित नसून त्याला विशेष महत्त्व आहे. हे शहर एकेकाळी त्यांचे 'दुसरे घर' होते; मात्र, कट्टरवादी लोकांची दहशत आणि सुरक्षेच्या कारणांमुळे त्यांना हे शहर नाइलाजास्तव सोडावे लागले होते.

रवींद्र सदन येथील त्यांच्या उपस्थितीमुळे लेखक, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय नेते तिथे एकत्र येण्याची शक्यता आहे. यातील अनेकांसाठी हा कार्यक्रम म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अल्पसंख्यकांचे हक्क, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही समाजात असहमतीशी संबंधित मुद्यांवर नव्याने विचारमंथन करण्याची संधी ठरणार आहे.

१ ऑगस्टच्या कार्यक्रमाची तयारी सुरू असतानाच या बंगाल भेटीमुळे डॉ. तस्लिमा नसरीन यांचे आयुष्य आणि कार्य ज्या मुद्यांभोवती तीन दशकांहून अधिक काळ फिरत राहिले आहे, त्या मुद्यांवर पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे. यातून व्यापक सहमती निर्माण होवो किंवा एखादा नवीन राजकीय वाद उफाळून येवो, त्यांचे हे पुनरागमन दक्षिण आशियातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि धार्मिक टीकेबाबत सुरू असलेल्या चर्चेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना ठरली आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

## अनेकदा जीवघेणे हल्ले

डॉ. तस्लिमा नसरीन यांच्या पुरोगामी आणि स्त्रीवादी लिखाणामुळे (विशेषतः 'लज्जा' या कादंबरीमुळे) जिहादी कट्टरतावादी संघटनांनी त्यांच्यावर अनेक वेळा जीवघेणे हल्ले केले आहेत आणि फतवे जारी केले आहेत. त्यांच्यावर झालेल्या प्रमुख हल्ल्यांचा व विरोधाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

**१. बांगलादेश (१९९३-१९९४)ः** कट्टरतावादी संघटना 'कौन्सिल ऑफ सोल्जर्स ऑफ इस्लाम'ने १९९३ मध्ये तस्लिमा यांच्याविरोधात फतवा काढून त्यांच्या हत्येसाठी बक्षीस जाहीर केले होते.

१९९४ मध्ये राष्ट्रीय पुस्तक मेळाव्यात कट्टरपंथीयांनी त्यांच्यावर थेट शारीरिक हल्ला केला, त्यांना जमिनीवर पाडून मारहाण केली आणि त्यांचे कपडे फाडण्याचा प्रयत्न केला. वाढत्या हिंसेमुळे आणि लाखो मूलतत्त्ववाद्यांच्या निदर्शनांमुळे त्यांना बांगलादेश देश सोडून पळून जावे लागले.

**२. हैदराबाद,** भारत (२००७):९ ऑगस्ट २००७ रोजी हैदराबादमधील प्रेस क्लब येथे त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) च्या आमदारांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर हिंसक हल्ला केला. या कट्टरतावादी जमावाने त्यांच्यावर खुर्च्या फेकल्या आणि त्यांना धक्काबुक्की केली.

**३. इतर देशांतील घटना :**

**इंग्लंडः** नॉटिंगहॅम येथे मुस्लिम विद्यार्थ्यांच्या एका गटाने त्यांच्यावर शारीरिक हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना वाचवले.

**कॅनडाः** कॉनकोर्डिया विद्यापीठात भाषण देत असताना मूलतत्त्ववादी विद्यार्थी निदर्शनांमुळे त्यांना आपले भाषण अर्धवट सोडावे लागले होते.

**४. कोलकाता, भारतः**२००४ मध्ये कोलकात्यात स्थायिक झाल्यानंतरही इस्लामिक कट्टरतावाद्यांनी त्यांच्याविरोधात निदर्शने केली आणि त्यांना शहराबाहेर काढण्यासाठी हिंसक दबाव आणला, ज्यामुळे अखेर त्यांना २००७ मध्ये पश्चिम बंगाल सोडावा लागला.

---

संरक्षण

# सौदी अरबला हवे भारताचे 'अस्त्र'

डॉ. विष्णू अरविंद



**सौदी अरबला एफ-१५ ताफ्यासाठी भारताच्या 'अस्त्र एमके१' क्षेपणास्त्रामध्ये विशेष स्वारस्य आहे. कारण यामुळे सौदीची संरक्षण क्षमता वाढणार आहे. तर दुसरीकडे भारताच्या जागतिक स्तरावर स्वदेशी संरक्षण निर्यातीच्या शक्यता वाढल्या आहेत. त्यामुळे संरक्षण निर्यात आणि स्वदेशी क्षेपणास्त्र कार्यक्रमासाठी हा आणखी एक संभाव्य मैलाचा दगड आहे.**

भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन कार्यक्रमाला आणखी एक महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय यश मिळण्याची शक्यता आहे. कारण 'अस्त्र एमके१' या 'बियॉन्ड-व्हिज्युअल-रेंज एअर-टू-एअर मिसाईल' (बीव्हीआरएएम) साठी सौदी अरब एक संभाव्य ग्राहक म्हणून समोर येत आहे. इंडोनेशियानंतर या क्षेपणास्त्राबाबत परदेशात वाढलेली उत्सुकता आणि भारताच्या स्वदेशी क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाला जागतिक स्तरावर मिळणारी वाढती मान्यता या घडामोडींतून अधोरेखित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, 'अस्त्र एमके१' खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या देशांच्या यादीत सौदी अरबचाही समावेश झाला आहे. 'रॉयल सौदी एअर फोर्स' (आरएसएफ) आपल्या एफ-१५एस आणि एफ-१५एसए या लढाऊ विमानांवर हे क्षेपणास्त्र बसवण्याच्या दृष्टीने त्याचे मूल्यांकन करीत असल्याचे वृत्त आहे. स्पर्धात्मक किंमत, उपलब्धता आणि पुरवठा साखळीची भक्कमता हे घटक सौदी अरबच्या या उत्सुकतेमागील मुख्य कारणे असल्याचे मानले जाते.

नवी दिल्ली किंवा रियाध यांपैकी कोणाकडूनही अद्याप याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही; तरीही, सुरू असलेल्या या मूल्यांकनामुळे प्रगत संरक्षण प्रणालींचा पुरवठादार म्हणून भारताची विश्वासार्हता वाढत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, पाश्चात्त्य उत्पादकांचे वर्चस्व असलेल्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्यास सक्षम अशा प्रणाली भारताकडून पुरवल्या जात आहेत.

**भारतासाठी नवीन संधी**

सौदी अरबने हे स्वारस्य अशावेळी दाखवले आहे जेव्हा जागतिक संरक्षणविषयक वातावरण पूर्णपणे आणि तेही वेगाने बदलत आहे. एएफआयच्या जवळच्या सूत्रांनुसार, इराणसोबतच्या अलीकडील लष्करी कारवाईनंतर अमेरिका आणि अनेक मित्र राष्ट्रांनी केलेल्या पुनर्भरणाच्या गरजेमुळे एआयएम-१२० या प्रगत मध्यम-पल्ल्याच्या हवेतून-हवेत मारा करणार्या क्षेपणास्त्राची (एमआरएएएम) आंतरराष्ट्रीय मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खरेदीतील या वाढीमुळे नवीन एएमआरएएम ऑर्डर्ससाठी प्रॉडक्शन लाईन आणि वितरणाची कालमर्यादा वाढली आहे, ज्यामुळे काही देशांना दृष्टिपथाबाहेरील पर्यायी क्षेपणास्त्र प्रणालींचा विचार करण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. तथापि, वाढलेल्या खरेदी




आणि पुनर्भरणाच्या प्रयत्नांमुळे एएमआरएएमची जागतिक मागणी निःसंशयपणे वाढली असली तरी, या घटनाक्रमामुळे रियाध अस्त्र एमके १ चे मूल्यांकन करीत आहे, असे अमेरिका किंवा सौदी अरब या दोघांनीही अधिकृतपणे असे म्हटलेले नाही.

या पृष्ठभूमीवर, भारताचे स्वदेशी क्षेपणास्त्र एक स्पर्धात्मक पर्याय म्हणून उदयास आले आहे. सूत्रांनुसार, अस्त्र एमके१ यासाठी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे कारण त्यात अॅक्टिव्ह रडार सीकर, द्विदिशीय (टू-वे) डेटालिंक आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक काऊंटर-काऊंटरमेजर (ईसीसीएम) क्षमता यांचा मिलाफ आहे. तसेच तुलनात्मक दृष्ट्या पाश्चात्त्य दृष्टिपथाबाहेरील क्षेपणास्त्रांपेक्षा त्याची खरेदी किंमत लक्षणीय रीत्या कमी आहे.

हे क्षेपणास्त्र भारतीय हवाई दल आणि भारतीय नौदल या दोन्ही दलांमध्ये आधीच कार्यान्वित झाले आहे आणि सध्या भारत डायनॅमिक्स लिमिटेड (बीडीएल) द्वारे त्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जात आहे, जे भारताच्या देशांतर्गत क्षेपणास्त्र उत्पादन परिसंस्थेची परिपक्वता दर्शवते.

सौदी अरबकडे जगातील एफ-१५ लढाऊ विमानांचा सर्वांत मोठा ताफा आहे. रॉयल सौदी हवाई दलाच्या ताफ्यात सुधारित एफ-१५एस लढाऊ विमाने आणि अधिक प्रगत एफ-१५एसए प्रकाराचा समावेश आहे, जे दोन्ही सौदी अरबच्या लांब पल्ल्याच्या हवाई लढाऊ क्षमतेचा कणा आहेत. येत्या दशकांमध्ये आपल्या एफ-१५ ताफ्याची कार्यात्मक प्रासंगिकता सुनिश्चित करण्यासाठी रियाध अतिरिक्त आधुनिकीकरण कार्यक्रमांचाही पाठपुरावा करत आहे. सूत्रांनुसार, एफ-१५ प्लॅटफॉर्मसाठी 'अस्त्र एमके१' ला अनुकूलित करण्यामध्ये प्रामुख्याने विमानाच्या मिशन कॉम्प्युटर, शस्त्र व्यवस्थापन प्रणाली आणि फायर-कंट्रोल रडारसोबत सॉफ्टवेअर एकत्रीकरण (इंटीग्रेशन) तसेच व्यापक उड्डाण चाचण्या आणि प्रमाणीकरण यांचा समावेश असेल. जर हे एकत्रीकरण पूर्ण झाले, तर भारताचे स्वदेशी 'बियॉन्ड-व्हिज्युअल-रेंज' क्षेपणास्त्र पाश्चात्त्य लढाऊ विमान प्लॅटफॉर्ममध्ये यशस्वी रीत्या एकत्रित केल्याच्या पहिल्या उदाहरणांपैकी हे एक ठरेल.

**भारताच्या संरक्षण निर्यातीला चालना**

सौदी अरबकडून आलेले हे मूल्यांकन, जागतिक संरक्षण निर्यात बाजारपेठेत भारताच्या वाढत्या उपस्थितीचे आणखी एक द्योतक मानले जात आहे. गेल्या काही वर्षांपासून, नवी दिल्लीने संरक्षण आत्मनिर्भरतेच्या दृष्टिकोनातून स्वदेशी संशोधन, विकास आणि उत्पादनामध्ये सातत्याने गुंतवणूक वाढवली आहे, ज्यामुळे अनेक देशांतर्गत विकसित शस्त्रप्रणालींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधून घेतले आहे.

अस्त्र एमके१ कडे आधीच अशा देशांचे लक्ष वेधले गेले आहे, जे सध्याच्या लढाऊ विमानांच्या ताफ्याशी सुसंगत, विश्वसनीय आणि किफायतशीर हवेतून हवेत मारा करणार्या क्षेपणास्त्रांच्या शोधात आहेत. इंडोनेशियाने दाखवलेल्या विशेष स्वारस्यानंतर, सौदी अरबचे मूल्यांकन हे या क्षेपणास्त्राच्या निर्यातीच्या संभाव्यतेसाठी आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. जर रियाधने अखेरीस ही खरेदी प्रक्रिया पुढे नेली, तर पश्चिम आशियामध्ये भारतासाठी ही सर्वांत महत्त्वपूर्ण क्षेपणास्त्र निर्यात संधींपैकी एक असेल. तात्काळ व्यावसायिक फायद्यांपलीकडे, अशा करारामुळे भारत आणि सौदी अरब यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक दृढ होईल, तसेच प्रगत लष्करी तंत्रज्ञानाचा एक विश्वसनीय पुरवठादार म्हणून भारताची प्रतिष्ठा वाढेल.

जागतिक क्षेपणास्त्र खरेदीमध्ये उपलब्धता हा देखील एक वाढता महत्त्वाचा घटक बनला आहे. वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पृष्ठभूमीवर देश आपली हवाई लढाऊ क्षमता वाढवत असताना, संरक्षण नियोजक खात्रीशीर वितरण, वैविध्यपूर्ण पुरवठा साखळी आणि वाढलेल्या आंतरराष्ट्रीय मागणीच्या काळात क्षेपणास्त्रांचा साठा टिकवून ठेवण्याच्या क्षमतेवर अधिक भर देत आहेत. या घटकांमुळे स्पर्धात्मक किमतींसह विश्वसनीय उत्पादन क्षमता देऊ शकणार्या पर्यायी पुरवठादारांचे आकर्षण वाढले आहे.

सौदी अरबला अस्त्र एमके१ ची यशस्वी निर्यात ही भारतासाठी केवळ एका संरक्षण करारापुरती मर्यादित राहणार नाही. यामुळे प्रगत पाश्चात्त्य लढाऊ विमान वापरणाऱ्या देशांकडून भारताच्या स्वदेशी क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाला मान्यता मिळेल आणि देशाच्या वाढत्या संरक्षण औद्योगिक पायावरील विश्वास दृढ होईल. अशा यशामुळे भविष्यात अधिक प्रगत प्रकारांच्या निर्यातीसाठी मार्गही तयार होऊ शकतो, ज्यात सध्या विकासाधीन असलेल्या अधिक पल्ल्याच्या अस्त्र एमके२ चा समावेश आहे.

तथापि, सध्या या सर्व चर्चांना सरकारी सूत्रांकडून दुजोरा मिळालेला नाही. भारतीय संरक्षण मंत्रालय, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ), भारत डायनॅमिक्स लिमिटेड (बीडीएल) किंवा सौदी संरक्षण मंत्रालय यापैकी कोणीही या वृत्तांना दुजोरा दिलेला नाही. बहुतेक मोठ्या संरक्षण खरेदींप्रमाणेच, कोणताही औपचारिक करार अंतिम होण्यापूर्वी, संभाव्य कराराला सविस्तर तांत्रिक मूल्यांकन, सुसंगतता तपासणी, व्यावसायिक वाटाघाटी आणि सरकारी मंजुरी या प्रक्रियांमधून जावे लागेल अशी अपेक्षा असते. तरीही, सौदी अरबने दाखवलेले स्वारस्य ही भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांवरील वाढता आंतरराष्ट्रीय विश्वास दर्शवते. जागतिक शस्त्रास्त्र बाजारात एक अधिकाधिक प्रभावशाली देश म्हणून भारत उदयास येत आहे, हे या घडामोडींमुळे सिद्ध झाले आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

# दिशाहीन असंतोष की राजकीय अजेंडा

(पान I वरून)

पण नंतर त्याच नैतिक ऊर्जेचा वापर राजकीय पक्षासाठी केला गेला. अण्णा हजारे आणि अरविंद केजरीवाल यांचे मार्ग वेगळे झाले. सत्तेवर आल्यानंतर या पक्षावरही विविध भ्रष्टाचाराचे, यंत्रणेचा दुरुपयोग करण्याचे आरोप झाले, अनेक वाद उद्‌भवले. सर्वांत मोठा विरोधाभास म्हणजे याच पक्षाने भ्रष्टाचाराविरुद्ध, यंत्रणेविरुद्ध लढा देण्याचा दावा केला होता. त्यामुळे, जेव्हा एखादे नवीन आंदोलन पुन्हा एखाद्या निष्कलंक नैतिक प्रतीकाच्या शोधात असते, तेव्हा इतिहास पुन्हा धोक्याची घंटा वाजवतो.

यावेळी ते प्रतीक सोनम वांगचुक बनले. चित्रपट संस्कृतीने आधीच त्यांच्याभोवती एक आदर्शवादी वलय निर्माण केले होते. फुन्सुख वांगडू यांच्या लोकप्रिय स्मृतीने खर्या सोनम वांगचुक यांनाही निष्कलंक, नैतिक चारित्र्याचे व्यक्तिमत्त्व म्हणून स्थापित केले होते. पण एखाद्या व्यक्तीची, कलावंताची चित्रपटातील आणि प्रत्यक्षातली प्रतिमा वेगळी असते. एखाद्याला कितीही नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ ठरवले तरी त्याचे निर्णय, संस्था, राजकीय संबंध आणि सार्वजनिक वक्तव्ये यांची चिकित्सा करणे, ती तपासणे आवश्यक ठरते. वांगचुक यांच्याशी संबंधित वाद, जसे की जमिनीचे वाटप, संस्थात्मक मान्यता, परदेशी निधीची पूर्तता, लडाख आंदोलन आणि सरकारी कारवाई, या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. या सर्वांचे राष्ट्रीय स्तरावर परिणाम झाले आहेत. त्यांनी लडाखमध्ये केलेले आंदोलन, यात देण्यात आलेल्या घोषणा, विशिष्ट विदेशी स्वयंसेवी संस्थांकडून त्यांना मिळणारा पाठिंबा या सर्व गोष्टी चिंताजनक आहेत. त्यांच्याशी संबंधित गोष्टी लपवणे अयोग्य आहे. किंबहुना, नैतिकतेच्या आवरणात गुंडाळून सादर केलेल्या प्रतीकावर कुणी टीका करू नये असे म्हणणे म्हणजे लोकशाही सदसद्विवेकबुद्धीचा त्याग करण्यासारखे



आहे. सोनम वांगचुक यांचे उपोषण, जणू काही आंदोलनासाठी नैतिक भांडवल म्हणून जपले गेले. उपोषणाचे दिवस जसजसे पुढे सरकत गेले, तसतसे मुख्य मागे पडले आणि आणि त्यांच्या आरोग्याचा मुद्दा समोर आला. ही भावनिकदृष्ट्या एक प्रभावी रणनीती होती. एखाद्या व्यक्तीचे ढासळणारे आरोग्य स्वाभाविकपणे सहानुभूती निर्माण करते. परंतु सहानुभूती ही धोरणाला पर्याय ठरू शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या शरीराला तर्काचे अंतिम न्यायालय बनवता येणार नाही.

दरम्यान, भोजनाचे तसेच विविध पदार्थांवर ताव मारणार्या आयोजकांचे व्हिडीओ सार्वजनिक झाल्याने आंदोलनातील प्रतीकात्मक विसंगती उघड झाली. आयोजकांनी सांगितले की, संचालन करणारी टीम उपोषणावर नव्हती आणि काही व्हिडीओ जुने होते. आयोजकांच्या म्हणण्यात तथ्य असेलही, परंतु राजकारणात अनेकदा दृश्यांना तथ्यांपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. एकीकडे उपोषणामुळे दुर्बळ झालेले प्रतीक आणि दुसरीकडे भोजनावर ताव मारणारे नेतृत्व. हा विरोधाभास, जरी तांत्रिकदृष्ट्या चुकीचा नसला तरी, आंदोलनाच्या नैतिक संरचनेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. जंतरमंतर येथील मंचावर 'हम देखेंगे' आणि 'बस नाम रहेगा अल्लाह का' सारख्या सादरीकरणांनी त्यामागे दडलेली कटुता उघड केली. सार्वजनिक आंदोलनाचा मंच म्हणजे साहित्यिक प्रयोगशाळा नाही. ती एक अत्यंत संवेदनशील खिडकी असते. लोक त्यातून पाहतात आणि तुम्हीही त्यात दिसता. येथे जनता विचारांची सूक्ष्मपणे तपासणी करते.

आंदोलनाच्या मंचावर कोण कोण येतात, ते काय बोलतात आणि कोणती प्रतीके वापरतात, ही आयोजकांची राजकीय जबाबदारी असते. जर आंदोलनकर्ते समस्त भारतीय तरुणांसाठी आमचे व्यासपीठ असल्याचा दावा करीत असतील तर ते व्यासपीठ असंवेदनशील किंवा मस्कर्यांचा मेळावा कसा असू शकते? आयोजकांनी वादग्रस्त घटकांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊन नंतर आपण निष्पाप असल्याचा आव आणणे कुठल्याही परिस्थितीत स्वीकारण्यासारखे नाही. सार्वजनिक मंच म्हणजे भाड्याची खोली नाही, जिथे येणाऱ्या-जाणाऱ्याशी मालकाचा काही संबंध नसतो. मंच हा चळवळीचा, आंदोलनाचा आणि त्याच्या विचारांचा चेहरा असतो.

हे आंदोलन आता केवळ विद्यार्थ्यांचे आंदोलन राहिलेले नाही, हे संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काढलेल्या मोर्चावरून देखील सूचित होते. ते राजकीय वैधता, माध्यमांमधील प्रसिद्धी आणि विरोधी पक्षांच्या एकजुटीसाठी एक प्रक्षोभक साधन बनले आहे. विविध मुद्दे, व्यक्ती आणि समूहांना जोडण्याचा हा प्रयत्न एका व्यापक नागरी आकांक्षांचे प्रतिबिंब म्हणून पाहिला जाऊ शकला असता, परंतु स्पष्ट वैचारिक अधिष्ठान नसल्यामुळे अशी आघाडी बऱ्याचदा संधिसाधूपणाचा बाजार बनते.

अखेरीस, हे आंदोलन राजकीय का बनले हा प्रश्न नाही. प्रत्येक गंभीर आंदोलनाचे राजकीय परिणाम होतातच. खरा प्रश्न हा आहे की, त्याने आपले राजकारण प्रामाणिकपणे स्वीकारले आहे का, या आंदोलनाने आपली आर्थिक स्थिती, संघटना, नेतृत्व, पक्षीय संलग्नता, सोशल मीडिया नेटवर्क आणि भविष्यातील योजना सार्वजनिक केल्या का? आंदोलकांनी 'नीट' च्या समस्यांवर ठोस उपाययोजना सुचवला का? या आंदोलनकर्त्यांनी बनावट पदव्यांचा मूलभूत प्रश्न उपस्थित केला का? त्यांनी मंचावरील शिस्त राखली का? त्यांनी प्रेक्षक, अनुयायी आणि प्रत्यक्ष काम करणारे कार्यकर्ते यांच्यातील फरक ओळखला का? तरुणांच्या समस्या, त्यांचे दुःख, वेदना नाकारणे हा सत्तेचा अहंकार आहे. पण त्या दुःखाचे डिजिटल तमाशा, राजकीय ब्रँडिंग आणि नैतिक व्यापारात रूपांतर करणे म्हणजे आंदोलनात्मक संधिसाधूपणा आहे. केवळ नैतिकतेचा बुरखा पांघरल्याने एखादी चळवळ अथवा आंदोलन नैतिक बनत नाही. खरी नैतिकता तेव्हाच दिसून येते जेव्हा चळवळ आपल्या पक्षाची अगदी गैरसोयीची तथ्येसुद्धा मांडते, आपल्या नेत्यांना प्रश्न विचारते, आपल्या मंचाच्या मर्यादा निश्चित करते आणि ज्या मूळ समस्येच्या नावाखाली तिने जनतेचा विश्वास मिळवण्याचा प्रयत्न केला होता, त्यापासून ती मागे हटत नाही. अन्यथा, ते आंदोलन अथवा चळवळ मशाल राहत नाही, ती कॅमेऱ्यासमोर जळणारी एक फुलझडी बनते. त्यात खूप चमकधमक असते, खूप धूर असतो, पण काळोख तसाच राहतो.

(पांचजन्यवरून साभार)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# स्मार्ट मीटर आणि सौर ऊर्जेवरील अवाजवी कर रद्द करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
महावितरण कंपनीतर्फे ग्राहकांची कोणतीही संमती न घेता, त्यांच्या घरातील सुस्थितीतील आणि चालू असलेले जुने वीज मीटर काढून त्याऐवजी 'स्मार्ट मीटर' सक्तीने बसवले जात आहेत. महावितरणची ही दादागिरी तात्काळ थांबवण्यात यावी, तसेच सौर ऊर्जेवर (सोलार) लावलेले अवाजवी आणि अनावश्यक कर तात्काळ रद्द करण्यात यावेत, या मागण्यांसाठी हिंगोलीतील वीज ग्राहक आणि विविध राजकीय व सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत.

याच संदर्भात गुरुवारी, ३० जुलै रोजी राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांच्या नावे हिंगोली महावितरणचे अधिक्षीक अभियंता यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. यावेळी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांची उपस्थिती होती. निवेदनात ग्राहकांची संमती न घेता जबरदस्तीने बसवले जाणारे 'स्मार्ट मीटर' बसवणे तात्काळ बंद करण्यात यावे. ज्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत, ते तात्काळ काढून त्याऐवजी पूर्वीचेच जुने मीटर पुन्हा बसवण्यात यावेत.

सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या ग्राहकांवर लावण्यात आलेली भरमसाठ व अवाजवी कर आकारणी पूर्णपणे रद्द करण्यात यावी. महावितरण प्रशासनाला आणि राज्य शासनाला प्रशासकीय निवेदनाद्वारे ११ ऑगस्टपर्यंतची मुदत (अल्टिमेटम) देण्यात येत आहे. या कालावधीत ग्राहकांच्या न्याय्य मागण्या मान्य न झाल्यास, ११ ऑगस्ट रोजी हिंगोलीतील वीज वितरण कार्यालयावर प्रचंड धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.यावेळी नंदकिशोर तोष्णीवाल, सुमित चौधरी, पंकज अग्रवाल, रवी नेनवाणी, शेख खलीत बेलदार, शेख नौमान नवेद, दिलीप चव्हाण बसंतकुमार भट्ट आदींची उपस्थिती होती.

# गाव पातळीवर प्रसिध्द यादी व पोर्टलवरील रकमेतील तफावतीबाबत शेतकऱ्यांनी गोंधळून जाऊ नये

## सहकार आयुक्तांचे स्पष्टीकरण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
राज्य शासनाने दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली आहे. या योजनेमध्ये कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना व प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे.

या योजनेतंर्गत कर्जमाफी व एकवेळ समझोता घटकाकरिता योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख कर्जखात्यांची माहिती सादर केली आहे. बँकेमार्फत सादर केलेल्या कर्जखात्यांचे 'महा-आयटी'मार्फत योजना निकषानुसार संगणकीय संस्करण करुन दि. २५ जुलै २०२६ रोजी एकूण १६.९६ लाख कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिध्द करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील ७.०३ लाख कर्जखाती व व्यापारी बँकांकडील ९.९३ लाख कर्जखात्यांचा समावेश आहे. या योजनेतील गावपातळीवर प्रसिध्द झालेल्या याद्यामध्ये व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या थकबाकी रक्कम तसेच योजनेच्या पोर्टलवरील रकमेत फरक असल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या व्यापारी बँकांच्या यादीतील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या कर्जमाफी पात्र रकमेबाबत राज्याचे सहकारी संस्थेचे सहकार आयुक्त तथा निबंधक दिपक तावरे यांनी स्पष्टीकरण जारी केले आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी जाहीर केलेल्या या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समजोता योजना आणि प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे. योजनेअंतर्गत बँकांकडून प्राप्त झालेल्या कर्जखात्यांच्या माहितीच्या आधारे गावनिहाय पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी गावपातळीवरील यादीतील रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवर दर्शविलेल्या थकबाकीच्या रकमेमध्ये फरक असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत योजनेच्या पोर्टलवर दर्शविलेली थकबाकीची रक्कम ग्राह्य धरावी. पोर्टलवर दिसणारी थकबाकी ही ३१ मार्च २०२६ रोजीची असून, शासनाच्या निर्देशानुसार १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आकारलेले नसल्याचे सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांनी पोर्टलवरील माहिती मान्य असल्यास आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण करावे. आधार प्रमाणीकरण यशस्वी झाल्यानंतर त्याची पावती उपलब्ध होईल. या पावतीमध्ये कर्जमुक्ती होणाऱ्या रकमेची माहितीही नमूद असेल. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम थेट डीबीटीद्वारे जमा करण्यात येईल. कर्जमुक्ती पूर्ण झाल्यानंतर संबंधित बँकेमार्फत कर्ज बेबाकी प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे.

कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना संबंधित बँकांमार्फत पुढील खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, पोर्टलवरील रक्कम किंवा कर्जासंदर्भातील इतर कोणतीही माहिती चुकीची वाटल्यास शेतकऱ्यांनी पोर्टलवर तक्रार नोंदवावी. अशा तक्रारींचे निराकरण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येणार असल्याचे सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त १८ ऑगस्ट हा दिवस राज्यभर 'पराक्रम दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने १ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचा परिचय नवीन पिढीला व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. 'पराक्रम दिन' साजरा करण्यासाठी अमृत संस्थेमार्फत 'पराक्रम दिन समिती' स्थापन करण्यात आली असून, समितीमध्ये काकासाहेब विधाते, पांडुरंग बलकवडे, जगन्नाथ लडकत, मोहन शेटे, मंगेश खाडिलकर व श्रीमती कौमुदी परांजपे या इतिहास अभ्यासकांचा समावेश आहे.

या स्पर्धांमध्ये निबंध, वक्तृत्व आणि रिल्स या तीन प्रकारांचा समावेश असून निबंध व वक्तृत्व स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन आणि खुल्या गटासाठी, तर रिल्स स्पर्धा महाविद्यालयीन आणि खुल्या गटासाठी आयोजित करण्यात आली आहे.

निबंध स्पर्धेसाठी मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत जास्तीत जास्त एक हजार शब्दांचा निबंध टंकलिखीत (टाईप) करून त्याची पीडीएफ स्वरूपातील प्रवेशिका सादर करावी लागणार आहे. वक्तृत्व स्पर्धेत स्पर्धकांनी स्वतःच्या भाषणाचा जास्तीत जास्त सात मिनिटांचा दर्जेदार व्हिडिओ अपलोड करणे आवश्यक असून, त्यामध्ये कोणतेही व्हिज्युअल किंवा साऊंड इफेक्ट्स तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) द्वारे तयार केलेल्या प्रतिमांचा वापर करता येणार नाही. रिल्स स्पर्धेसाठीही प्रवेशिका १ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्वीकारण्यात येणार आहेत.

स्पर्धांचे विषय, नियमावली, बक्षिसांची माहिती, सहभाग नोंदणीची प्रक्रिया तसेच संदर्भ साहित्य अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवनकार्यावरील निवडक संदर्भ पुस्तके तसेच ई-बुकही या संकेतस्थळावर उपलब्ध असून, स्पर्धेतील विषय आणि प्रश्नावली याच संदर्भ साहित्याच्या आधारे तयार करण्यात आली आहे. सर्व शाळा, महाविद्यालये तसेच इच्छुक नागरिकांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मिरवणुकीत डीजे लावण्यावर बंदी



हिंगोली- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमितत येथील शहर पोलिस ठाण्यात जयंती समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक दि ३० जुलै रोजी घेण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी नारायणराव देशमुख, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी देशमुख यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती शांततेत आणि उत्साहात साजरी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच डीजे वाजविण्यावर बंदी असून मंडळ समित्यांनी डीजे ऐवजी इतर वाद्यांचा वापर करावा तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.

### स्वामी समर्थ केंद्रात उत्साहात गुरूपोर्णिमा



हिंगोली- दिंडोरी प्रणीत श्री स्वामी समर्थ केंद्र, नाईक नगर येथे गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या पावन प्रसंगी परिसरातील हजारो भाविक व सेवेकऱ्यांनी स्वामींना आपले गुरु मानून रीतसर गुरूपद ग्रहण केले. दिवसभर चाललेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण नाईक नगर परिसर 'श्री स्वामी समर्थ'च्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. गुरुपौर्णिमेच्या या विशेष प्रसंगी आयोजित श्री स्वामी समर्थांच्या मुख्य महाआरतीचा बहुमान हिंगोलीचे नगराध्यक्ष सौ रेखाताई. श्रीराम बांगर व व शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांना मिळाला. बांगर दांपत्याने स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करून आरती संपन्न केली. या वेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी केंद्राच्या प्रमुख पदाधिकारी विद्याताई पवार, अभिमन्यू ढोणे, अशोक गाढे, आशाताई बाहेकर, श्वेता बांगर, कुशावर्ता कांदे, अर्जुन बांगर, बबन बांगर, वैभव पारखे, साई पवार, सावळे, ओंकार, कोटकर, खंदारे यांच्यासह मोठ्या संख्येने सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

# वसमतच्या उपनगराध्यक्षाच्या शेतात १९ गोवंश आढळले

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३० जुलै**
वसमत विधानसभाचे आमदार राजू भैया नवघरे यांचे खंदे समर्थक शहराचे उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांच्या शेतात तब्बल १९ गोवंश आढळून आल्याच्या प्रकरणाने संपूर्ण वसमत तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली असून, पोलिसांनी जनावरे ताब्यात घेतल्याचे सांगितले जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, या जनावरांची अंदाजे किंमत १ लाख ६३ हजार रुपये आहे.



या घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. इतक्या मोठ्या संख्येने गोवंश उपनगराध्यक्षांच्या शेतात कसा पोहोचला? जनावरांबाबत आवश्यक परवानग्या व कागदपत्रे होती का? या प्रकरणात इतर कोणाचा सहभाग आहे का? या सर्व बाबींचा सखोल आणि निष्पक्ष तपास होणे अत्यावश्यक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील संविधानिक पदावर असलेल्या लोकप्रतिनिधीच्या शेतात हे प्रकरणसमोर आल्याने या घटनेचे गांभीर्य आणखी वाढले आहे. त्यामुळे कोणताही राजकीय दबाव किंवा हस्तक्षेप न होता तपास पारदर्शकपणे व्हावा आणि सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले असून, नागरिक प्रशासनाच्या भूमिकेकडे बारकाईने लक्ष ठेवून आहेत. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आता तपास यंत्रणांवर असल्याचे मतही व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली हे वसमत विधानसभेचे आमदार राजू भैय्या नवघरे यांचे खंड समर्थक असल्याची स्थानिक पातळीवर मानले जात आहे. मात्र, या प्रकरणात कोणालाही केवळ राजकीय संबंधांच्या आधारावर दोषी किंवा निर्दोष ठरविण्याऐवजी तपासातील पुराव्यांच्या आधारेच कारवाई होणे आवश्यक आहे.

दरम्यान, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आमदार राजू नवघरे यांची भूमिका काय असणार? ते निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशीची मागणी करणार का? तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करणार का? याकडे वसमतकरांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर अनेक नागरिकांकडून नैतिक जबाबदारीच्या मुद्द्यावरही चर्चा सुरू झाली असून, तपास पूर्ण होईपर्यंत संबंधित लोकप्रतिनिधींनी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी होत आहे.

दरम्यान या प्रकरणात आणखी एक मुद्दा चर्चेचा विषय ठरत आहे. काही नागरिकांच्या मध्ये चर्चा आहे की घटनास्थळी ७० ते ८० गोवंश असल्याचे दिसून आले होते? मात्र, ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या डीआरमध्ये केवळ १९ जनावरे जप्त केल्याची नोंद असल्याने विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

घटनास्थळी प्रत्यक्ष किती जनावरे होती? त्यापैकी किती जप्त करण्यात आली आणि उर्वरित जनावरांचे काय झाले? याबाबत पोलिसांनी अधिकृत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत असल्याची चर्चा आहे. तथापि, ७० ते ८० जनावरे असल्याचा दावा स्वतंत्रपणे अधिकृतरीत्या पुष्टी झालेला नाही. त्यामुळे या सर्व बाबींचा निष्पक्ष तपास होऊन वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे. आता या संपूर्ण प्रकरणाचा तपास ग्रामीण पोलीस ठाण्याकडून सुरू असून, तपासातून नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई होते का? याकडे संपूर्ण वसमतचे लक्ष लागले आहे.

# सोनवाडी येथे शेतीशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
आत्मा योजनेअंतर्गत शेतीशाळा प्रकल्प संचालक आत्मा प्रदीप कच्चवे, उप प्रकल्प संचालक जी बी बंटेवाड, तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे सोनवाडी येथे आत्मा अंतर्गत शेतकरी शेती शाळा घेण्यात आली. या शेती शाळेत मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. तसेच या शेतीशाळे मध्ये वेळेस जैविक निविष्ठा तयार करणे, जैविक.कीड व रोग व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले. या शेती शाळेसाठी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक के एस घुगे तसेच सहाय्यक कृषी अधिकारी गणेश कदम, विठ्ठलराव काळे, कुंडलिकराव काळे, तातेराव रिठे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोपाललाल मंदिरात गुरूपोर्णिमा उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
शहरातील गवळीपुरा भागात असलेल्या गोपाललाल मंदिरात गुरु पौर्णिमेनिमित्त सद्गुरु श्री प्रल्हाद महाराज रामदासी साखरखेर्डा यांच्या गुरु पौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. सौ स्मिता संजय मेथेकर व सौ ज्योती व्यंकटेश पहिणकर हे यजमान होते. मंदिरातील गुरु पौर्णिमा उत्सवाची ५० वर्षाची अखंड परंपरा आहे. परंपपुज्य सद् गुरुच्या कृपेने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गुरु पौर्णिमा उत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला यानिमित्ताने मंदिरात गुरु पौर्णिमेनिमित्त काकड़ा आरती, श्री अभिषेक (पवमान व रुद्र), नामजप, महानैवेद, महाआरती व महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. यासाठी श्रीराम सेवा मंडळ व समर्थ उपासना मंडळ हिंगोली यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत दोन दिवसांपासून दमदार पाऊस





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**
हिंगोली शहरासह परिसरात काल रात्रीपासून पावसाने चांगलाच जोर धरला आहे. रात्रभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे आज सकाळी संपूर्ण शहर जलमय झाल्याचे पाहायला मिळाले. एकीकडे पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असले, तरी दुसरीकडे या पहिल्या मोठ्या पावसाचा आनंद लुटताना नागरिक आणि शाळकरी मुले दिसून आली.

सकाळी शाळा सुटण्याच्या आणि सुरू होण्याच्या वेळेत पावसाचा जोर कायम होता. मात्र, या पावसातही शाळकरी मुला-मुलींचा उत्साह ओसंडून वाहत होता. हातात रंगीबेरंगी छत्र्या आणि रेनकोट घालून शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी पावसाचा मनमुराद आनंद घेतला. काही मुले छत्री बाजूला सारून पावसात भिजतच आनंदाने मारत असलेली मुसंडी शहरात कौतुकाचा विषय ठरत होती.

दुसरीकडे, कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांची मात्र या पावसामुळे चांगलीच पळापळ झाली. नेहमीच्या घाईगडबडीत त्यातच पावसाची भर पडल्याने नागरिक छत्री सांभाळत कामाचे ठिकाण गाठताना दिसले. विशेष म्हणजे, काही नागरिक दुचाकी चालवताना एक हाताने हँडल आणि दुसऱ्या हाताने छत्री सांभाळत कसरत करताना कॅमेऱ्यात कैद झाले.

शहरातील मुख्य चौक, बसस्थानक परिसर आणि बाजारपेठेत पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहनांचा वेग मंदावला होता. पावसाचे पाणी आणि रस्त्यावरील वाहतूक यामुळे मुख्य चौकात काही काळ वाहनांची लगबग आणि गर्दी पाहायला मिळाली.

एकंदरीत, काल रात्रीपासून सुरू असलेल्या या पावसाने हिंगोलीकरांना उकाड्यापासून मोठा दिलासा दिला असला, तरी सकाळी कामावर निघणाऱ्यांची मात्र चांगलीच धावपळ उडाली. चिमुकल्यांचा उत्साह आणि चाकरमान्यांची कसरत यामुळे आज सकाळचे हिंगोली शहरातील वातावरण भलतेच रंगतदार झाले होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# महावितरणच्या लोडशेडिंगचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर घाला !
# अभ्यासाऐवजी अंधारात रात्र, देगलूरमध्ये संतप्त जनतेचा हल्लाबोल

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३० जुलै -**
ग्रामीण भागातील सातत्याने सुरू असलेल्या अनियमित लोडशेडिंगमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देगलूर येथील महावितरण कार्यालयावर शेतकरी नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी हल्लाबोल व ठिय्या आंदोलन करत तीव्र संताप व्यक्त केला.



**होट्टल व करडखेड फिडर भागातच सर्वाधिक लोडशेडिंग !**
होट्टल व करडखेड फिडर परिसरात रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा खंडित राहत असल्याने शाळा, महाविद्यालय तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. विशेषतः रात्री अभ्यासाची वेळ असतानाच वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना अंधारात अभ्यास करावा लागत असून त्यांच्या भवितव्याशी महावितरणच्या लोडशेडिंग धोरणामुळे खेळ सुरू असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. मागील सहा-सात महिन्यांपासून रात्री साडेआठ वाजेपर्यंत विद्युत खंडित होत आहे तर सध्या यात वाढ होऊन दहा-साडेदहा पर्यंत विद्युत खंडित करुन अक्षरशः विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घातला जात आहे.

**खा. अशोकराव चव्हाण यांच्या आदेशाचे केवळ दोनच दिवस पालन?**
माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांनी मागील काही दिवसांपूर्वी महावितरण विभागाची कान उघडणी केली होती याचाच परिणाम या भागात केवळ दोनच दिवस विद्युत पुरवठा व्यवस्थित करण्यात आला. लोडशेडींग पासून मुक्तता मिळाली असे नागरिकांना वाटत होते, मात्र या आदेशाचे पालन केवळ दोनच दिवस करण्यात आले. पुन्हा महावितरणाचा लोडशेडींगचाच पाढा चालू आहे.

**पावसात अन् सणाच्या दिवशीही नागरीक मैदानात !**
ग्रामीण भागात आषाढी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जाते. पण आज अक्षरशः पाऊस पडत असताना आणि सणासुदीच्या दिवशीही ग्रामीण भागातील नागरिक व पालकांनी हल्लाबोल आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान नागरिकांनी महावितरण प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत ग्रामीण भागाला अखंड व दर्जेदार वीजपुरवठा करण्याची मागणी केली. होट्टल व करडखेड फिडरवरील वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा, रात्रीचे लोडशेडिंग बंद करावे आणि तांत्रिक बिघाड कायमस्वरूपी दूर करावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

**भ्रमणध्वनीद्वारे उपजिल्हाधिकाऱ्यांकडे त्रस्त नागरिकांनी मांडला प्रश्न**
देगलूर येथील उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांकडे सकारात्मक पाहतात. त्यामुळेच या भागातील त्रस्त नागरिकांनी महावितरणच्या लोडशेडींग प्रश्नावर त्वरित मार्ग काढावे अशी नागरिकांनी मागणी केली.

**लवकरच लोडशेडींगचा मार्ग काढणार ! : कार्यकारी अभियंता चाटे**
यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता चाटे सर यांनी माध्यमाशी संवाद साधताना म्हणाले की, लोडशेडींगचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. येणाऱ्या सहा दिवसांत कुशावाडी व होट्टल भागातील प्रश्न मिटेल आणि उर्वरित भागातही विस दिवसात लोडशेडींगचा प्रश्न मार्गी लागेल असे सांगितले तसेच सध्या तात्पुरत्या स्वरूपात वरीष्ठांशी चर्चा करुन लोडशेडींग कमी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

**अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारणार : कैलास येसगे**
या आंदोलनात नेते कैलास येसगे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणारे हे लोडशेडिंग तात्काळ बंद झाले पाहिजे. शेतकरी, व्यापारी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांनाही या धोरणाचा मोठा फटका बसत आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास यापेक्षाही तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असे येसगे यांनी सांगितले.

आंदोलनकर्त्यांनी कार्यकारी अभियंता व उपअभियंत्यांना घेराव घालून निवेदन सादर केले. ग्रामीण भागातील अनावश्यक लोडशेडिंग त्वरित बंद करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अन्यथा महिला, विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांच्या सहभागाने आणखी व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी शेषराव शिरपुरे, यादवराव फिरंगे, दिगंबर पाटील, भास्कर नरबागे, मिलिंद वाघमारे कुशावाडीकर, किसन राजुरे, संजय जाधव, अशोक बिरादार, उद्धव पोलमारे, शिवा धर्माजे, अजय रुमाले, दशरथ फिरंगे, दिलीप स्वामी, योगेश सूर्यवंशी, बळीराम गाडले, बजरंग आरळे, दत्ता उमाटे, संजय बिरादार, सचिन नागपुरे, कृष्णा पाटील, गौस, सोहेल शेख, नागनाथ आरळे, गंगाराम राजुरे, दादाराव गालचलवार, नागेश नागपुरे यांच्यासह बल्लूर, कुशावाडी, कारेगाव आणि परिसरातील शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड- शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयासमोर केवळ दोन दिवसाच्या पावसामुळे जमीन खचुन कार खड्ड्यात गाडली गेल्याचा धक्कादायक प्रकार घडला. प्राध्यापकाने प्रसांगवधानने स्वत:चा बचाव केला.**

## आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराजांचा कीर्तन सोहळा

**नवीन नांदेड** -मराठवाड्याचे लोकनेते,नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार व समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोकप्रिय कीर्तनकार इंदुरीकर महाराज हे आपल्या विनोदी शैलीतून प्रबोधनातुन जनजागृती पर किर्तन दिनांक १ ऑगस्ट रोजी भव्य कीर्तन सोहळा शनिवारी सायंकाळी ६ वाजता नांदेड शहरातील आशीर्वाद गार्डन मंगल कार्यालय, छत्रपती चौक येथे करण्याचे आयोले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष माधव पावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस संग्राम पाटील मोरे यांनी केले आहे. सदरील कीर्तन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाजप्रबोधनाच्या या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक माधवराव पावडे संग्राम पाटील मोरे यांनी केले आहे.



## देगलूर येथील कृषि विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करू नये

**नांदेड** -उपविभागीय कृषि अधिकारी देगलूर यांच्या अंतर्गत कृषि चिकित्सालय तालुका बीजगुणन केंद्र देगलूर यांच्या ताब्यात महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाची एकूण ६१.५८ हेक्टर जमीन असून ती देगलूर-हैदराबाद रोड लगत आहे. यापैकी गट क्रमांक १९९ क्षेत्र १३.४४ हेक्टर, गट क्रमांक २८९ क्षेत्र १.०९ हेक्टर, गट क्रमांक २९० क्षेत्र ०.२९ हेक्टर आणि गट क्रमांक २०० क्षेत्र १०.२२ हेक्टर या गटाची सीमा शहरालगत आहे. या क्षेत्रावर किंवा देगलूर हैदराबाद रोड लगत असलेल्या कृषि विभागाच्या क्षेत्रावर सीमा निश्चित नाही. सदरील गटांची सीमा निश्चित होईपर्यंत कोणीही या जमिनीवर तारेचे कुंपण, पत्र्याची शेड, अथवा बांधकाम करून अतिक्रमण करू नये. अन्यथा संबंधितांवर महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ अंतर्गत कलम ५३, ४० आणि ५१ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देगलूर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दिला आहे.

## चांडोळा बँकेचा खरब खंडगांवात एफ.एसी. कॅम्प

**आदमपूर** -मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्यावतीने मौजे खरब खंडगाव येथे सोमवार दि.२७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता बँक पदाधिकारी व गावातील बँकेच्या ग्राहकांसमवेत यशस्वी संपन्न झाला. या मेळाव्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना,प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना,२० रू.,४३६ रू.विमा सुरक्षा योजना,अटल पेन्शन योजना, उद्योग,व्यावसाय,बचत गटांना कर्ज वाटप आदि योजनांबद्दल शाखाप्रमुख प्रफुल्लकुमार पुंडगे साहेब यांनी गाव परिसरातील ग्राहकांना संक्षिप्त असे मार्गदर्शन केले. सर्वप्रथम शाखा व्यवस्थापक यांचा सत्कार सरस्वतीबाई काळेवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चांडोळा शाखा व्यवस्थापक प्रफुल्लकुमार पुंडगे ,बँक सहाय्यक महमदरफी मदार,बँक सीआरपी रिजवाना सय्यद,कोमल कदम,बचत गट अध्यक्षा मिराबाई जाधव, हाणिफाबी सय्यद, कोषाध्यक्ष अणुसयाबाई जाधव, सदस्य वर्षा जाधव,सकीनाबी सय्यद इत्यादी बचत गट कार्यकर्ती व समस्त गावकरी मंडळी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.सूत्रसंचालन बँक सीआरपी कोमल कदम यांनी केले.

## आषाढी एकादशीनिमित्त शैक्षणिक दिंडी

**अर्धापूर** -आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त एज्युव्हिजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूल, अर्धापूर यांच्या वतीने भव्य शैक्षणिक दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी आणि वारकरी यांच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत अर्धापूरकरांना अन्न व भेसळमुक्त महाराष्ट्र हा सामाजिक जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला. दिंडीत लहानग्या विद्यार्थ्यांनी संत परंपरेचा वारसा जपत वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविले. त्याचबरोबर अन्नातील भेसळविरोधी जनजागृती करणारा विशेष देखावा सादर करण्यात आला. अन्न सुरक्षा व भेसळविरोधी कारवाईसंदर्भात जनजागृतीसाठी कार्यरत असलेल्या अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या कार्यावर आधारित संदेश विद्यार्थ्यांनी अतिशय प्रभावीपणे मांडला. या देखाव्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शैक्षणिक दिंडीमुळे काही काळ अर्धापूर शहरात जणू पंढरीचेच वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागाने आणि पारंपरिक सादरीकरणाने उपस्थित नागरिकांची मने जिंकली. कार्यक्रमानंतर शाळेच्या प्राचार्या प्रिया रावते, संचालक प्रवीण रावते तसेच संस्थेचे अध्यक्ष रेखाताई रावते यांनी सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करून त्यांच्या योगदानाबद्दल कौतुक व्यक्त केले.

# लेकीच्या स्मृतीतून उजळली शिक्षणाची वाट'
## स्व. कु. प्रणाली शिंदे हिच्या स्मरणार्थ गरुड माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३० जुलै -**
माणूस जग सोडून जातो, पण त्याच्या आठवणी आणि संस्कार कायम जिवंत राहतात. अशाच एका हळव्या पण प्रेरणादायी भावनेतून स्वर्गीय कु. प्रणाली प्रवीण (बंडू) शिंदे (वाळकीकर) हिच्या स्मरणार्थ गरुड माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रणाली शिंदे ही २०२३ मध्ये याच विद्यालयात इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होती. शिक्षणात हुशार, अभ्यासू आणि स्वप्नाळू असलेल्या प्रणालीचे अल्पशा आजाराने अकाली निधन झाले. तिच्या अपूर्ण राहिलेल्या शैक्षणिक प्रवासाची आठवण जपत तिचे वडील प्रवीण उर्फ बंडू शिंदे (वाळकीकर) यांनी तिच्या स्मृतीला सामाजिक कार्यातून अभिवादन करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.



यावेळी त्यांनी विद्यालयाला भेट देत दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास, जिद्द आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यालयात भावनिक वातावरण निर्माण झाले. विद्यार्थिनींनी साहित्य स्वीकारताना स्व. प्रणालीच्या स्मृतीला अभिवादन केले, तर शिक्षकांनीही हा उपक्रम समाजासाठी आदर्श असल्याचे सांगितले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी प्रवीण उर्फ बंडू शिंदे यांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक करत, दुःखाला समाजसेवेचे रूप देणारा हा उपक्रम अनेक पालकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी स्वर्गीय कु. प्रणाली शिंदे हिला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. एका लेकीच्या स्मृतीतून दुसऱ्या अनेक मुलींच्या शिक्षणाची वाट उजळविण्याचा हा प्रयत्न उपस्थितांच्या मनाला स्पर्श करून गेला.

## प्रा. विश्वनाथ अप्रमंपार स्वामी यांच्या तिस वर्ष ज्ञान सेवेचा सेवापुर्ती गौरव सोहळा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३० जुलै -**
मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ या संकुलातील पोस्ट बेसीक ज्यु कालेज मधील अर्थशास्त्र विषयाचे तब्बल तीस वर्षे एक महिना अखंड निष्ठेने अध्यापन करून हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला ज्ञानाची दिशा देणारे ज्येष्ठ प्राध्यापक विश्वनाथ अप्रमंपार स्वामी हे नियत वयोमानानुसार शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ, प्रेरणादायी आणि कर्तृत्वपूर्ण शैक्षणिक सेवेला कृतज्ञ मानवंदना अर्पण करण्यासाठी संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यां च्या संयुक्त विद्यमाने प्रा. स्वामी व त्यांच्या धर्मपत्नी सौ. संतोषी विश्वनाथ स्वामी यांच्या सापत्नीक सेवा पूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



ज्ञानदान हेच जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानत प्रा. स्वामी यांनी तीन दशकांहून अधिक काळ विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची बीजे रुजविली.अभ्यासू, कर्तव्यदक्ष,शिस्तप्रिय आणि विद्यार्थीहित जपणारे शिक्षक म्हणून त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीत मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेकविद्यार्थी आज डॉक्टर,अभियंते, शिक्षक तसेच विविध शासकीय आणि खासगी क्षेत्रांत जबाबदारीची पदे सांभाळत समाज सेवेत कार्यरत असून, हीच त्यांच्या आयुष्यभराच्या ज्ञानसेवेची सर्वात मोठी कमाई मानली जाते.

दि.३१जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या सेवा पूर्ती गौरव सोहळ्यात प्रा. विश्वनाथ अपरंपार स्वामी व त्यांच्या धर्मपत्नी सौ. संतोषी विश्वनाथ स्वामी यांचा सापत्नीक सत्कार, शाल, श्रीफळ, वस्त्राहेर, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. या सेवापूर्ती गौरव सोहळ्यास माजी विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ सर्व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रा. विश्वनाथ अप्रमपार स्वामी यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा द्याव्यात,असे आवाहन संकुलातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुदखेडमध्ये लोकप्रतिनिधींना डावलण्याचे सत्र सुरूच?; जनआरोग्य शिबिरावरून नवा वाद

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३० जुलै -**
मुदखेड शहरात सरकारी व सामाजिक कार्यक्रमांमध्ये नगर परिषदेच्या लोकप्रतिनिधींना वारंवार डावलले जात असल्याचा आरोप पुन्हा एकदा समोर आला आहे. अवघ्या आठवडाभरात घडलेल्या दोन घटनांमुळे भाजपातील अंतर्गत मतभेदांची चर्चा नागरिकांमध्ये रंगली असून, जनआरोग्य शिबिराच्या निमित्ताने हा वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे.



ग्रामीण रुग्णालय, मुदखेड येथे २९ जुलै रोजी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. मात्र या कार्यक्रमात नगर परिषदेचे स्वच्छता सभापती तथा नगरसेवक रामसिंग चव्हाण यांना निमंत्रित करण्यात आले नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. आरोग्य आणि स्वच्छता हे नगर परिषदेशी थेट संबंधित विषय असतानाही संबंधित लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेतल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले.

या वादावर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. एमेकर यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, भोकर येथे जनआरोग्य शिबिर मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे तेथे सर्व मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. मात्र मुदखेड येथे हा कार्यक्रम मर्यादित स्वरूपाचा होता. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून केवळ नगराध्यक्षा यांनाच निमंत्रित करण्यात आले. कार्यक्रम मोठ्या स्वरूपात असता तर स्वच्छता सभापती, बांधकाम सभापती, इतर नगरसेवक तसेच पत्रकारांनाही निमंत्रण दिले असते.

मात्र या स्पष्टीकरणाने चर्चेला पूर्णविराम मिळालेला नाही. यापूर्वी २२ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक सेवा उपक्रमातही नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधव पाटील कदम व त्यांच्या प्रतिनिधींना डावलल्याचा आरोप झाला होता. त्या घटनेवरूनही शहरात पक्षांतर्गत नाराजीची चर्चा रंगली होती.

सलग दोन कार्यक्रमांत लोकप्रतिनिधींना वगळण्यात आल्याने हा केवळ योगायोग आहे की पक्षातील अंतर्गत समन्वयाचा अभाव, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. शहरात निवडणुकीच्या वेळी सर्वजण एकत्र दिसतात; मात्र प्रत्यक्ष कामाच्या वेळी एकमेकांनाच डावलले जाते, अशी चर्चा जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर भविष्यात सरकारी कार्यक्रमांचे नियोजन करताना सर्व संबंधित लोकप्रतिनिधींना समान सन्मानाने निमंत्रित करून समन्वय राखावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांना आभा कार्ड काढण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० जुलै -**
नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट आणि इतर अंतर्गत येणाऱ्या सर्व खाजगी आरोग्य संस्थांचे (रुग्णालये,क्लिनिक,डायग्नोस्टिक सेंटर,प्रयोगशाळा,मेडिकल स्टोअर,इमेजिंग सेंटर (एक्सरे/एमआरआय) यांची आयुष्यमान भारत डीजीटल मिशन अंतर्गत नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व सधन आणि दुर्बल नागरिकांनी सर्व कुटुंब सदस्यांचे इक या मोबाईल अप्लिकेशनद्वारे किंवा नजीकच्या आरोग्य केंद्रात जाऊन केवळ आधारकार्डच्या सहाय्याने आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत 'आभा' कार्ड काढण्याचे आवाहन प्रशासनाद्वारे केले आहे.

आयुष्मान भारत डिजिटल मिशनमुळे रुग्णांच्या आणि रुग्णालयाची माहितीची गोपनीयता आणि सुरक्षा सुरक्षित राहते किंवा शासनाद्वारे कोणत्याही खाजगी अस्थापना यावर नियंत्रण ठेवता येत नसल्याने कोणत्याही प्रकारची संकोच किंवा भीती न बाळगता महानगरपालिका क्षेत्रातील, तालुका स्तरावरील आणि ग्रामीण भागातील सर्व खाजगी रुग्णालये, क्लिनिक, डायग्नोस्टिक सेंटर, प्रयोगशाळा, मेडिकल स्टोअर, इमेजिंग सेंटर (एक्सरे/एमआरआय) यांनी HFR (HELTH FCILITY REGISTRY) व रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधिकारी आणि नर्सिंग स्टाफ यांचे एचपीआर (HELTH PREOFESSIONL REGISTRY) मध्ये नोंदणी आवश्य करावी. यासाठी आपल्याकडे नोंदणीसाठी येणाऱ्या शासकीय आरोग्य कर्मचारी यांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आयुष्मान भारत डिजिटल मिशन (BDM²) ही भारत सरकारच्या नॅशनल हेल्थ ऑथोरिटी (NH) द्वारे सुरू केलेली Unified Health Interface (UHI) प्रकारची एक महत्त्वाची योजना आहे. या मिशनचा मुख्य उद्देश देशातील नागरिकांसाठी एक अखंड डिजिटल आरोग्य पायाभूत सुविधा (Digital Health Infrastructure) तयार करणे हा आहे. याद्वारे रुग्णांचा वैद्यकीय इतिहास डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवणे, आरोग्य सेवा सुलभ करणे आणि रुग्ण, डॉक्टर व रुग्णालये यांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर जोडणे तसेच देशातील सर्व नागरिकांसाठी १४ अंकी आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट (BH) आयडी तयार करणे, वैद्यकीय नोंदी जतन करणे, जुने वैद्यकीय रिपोर्ट, प्रिस्क्रिप्शन आणि तपासणी अहवाल डिजिटल पद्धतीने साठवणे, रुग्णालये आणि डॉक्टरांमध्ये सुरक्षित व अधिकृतपणे आरोग्य डेटाची देवाणघेवाण सुलभ करणे, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे रुग्णाच्या संमतीशिवाय कोणताही आरोग्य विषयक माहिती शेअर न करता माहितीच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत असून रुग्ण आणि रुग्णालयाच्या माहितीची गोपनीयता ठेवणे देणे हा आहे.

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, भारत सरकार आणि आयुक्त आरोग्य सेवा मुंबई यांच्या आदेशानुसार आयुष्मान भारत डिजिटल मिशन यांच्या निर्देशानुसार नांदेड जिल्ह्याची BDM² Model District म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांचे क्ग्रऊ (HELTH FCILITY REGISTRY) व रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधिकारी आणि नर्सिंग स्टाफ यांचे क्ष्ठ (HELTH PREOFESSIONL REGISTRY) मध्ये नोंदणी करण्यात आलेली असून दैनंदिनरित्या नागरिकांचे आभा कार्ड काढण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.